सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक ०४ • जुलै २०२५ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## सहकार क्षेत्राच्या माध्यमातून राज्यात प्रथमच ‘उदंचन जलविद्युत प्रकल्प’




## सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी राष्ट्रीय बँक परिषदेचे आयोजन






## देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था होणार

## सहकार भारती कोल्हापूर विभाग कार्यकर्ता अभ्यास वर्ग






## सरसंघचालक डॉ. भागवत यांची शिक्षक सह. बँकेला भेट


दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
31
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अर्लट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2350 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
24x7 मोबाईल बँकिंग
आता
NEFT
RTGS
IMPS
UPI
आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार
॥ पांडुरंग ॥
आषाढी एकादशी च्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सौ. निलिमा बावणे
अध्यक्ष
सौ. सारिका पेंडसे
उपाध्यक्ष
या सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी वृंद
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303



र.नं. ८१९
राजर्षी शाहू
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
अखंड वाढ आपल्या गुंतवणुकीची..! दाम दुप्पट ठेव योजना
सोने तारण कर्ज
वेअर हाऊस कर्ज
अल्पबचत कर्ज
वाहन तारण कर्ज
बचत गट कर्ज
आषाढी एकादशी
निमित्त सर्व भाविक भक्तांना तसेच सर्व सभासद बंधू भगिनींना
हार्दिक शुभेच्छा..!
संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
अध्यक्ष राजर्षी शाहू परिवार
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस सुविधा देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे द्वारे कोणत्याही शाखेमध्ये जमा स्लीप किंवा विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून व्यवहार करता येईल.
राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-
Missed Call Balance check सुविधा
7877778870
WhatsApp Banking
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४.'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रू. चे कर्ज वाटप
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
CORE बँकिंग
LOAN सेवा सुविधा
SMS अलर्ट
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
DEPOSITE सुविधा
SHAHU PAY
MOBILE बँकिंग
DOORSTEP बँकिंग
NET बँकिंग
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com +९१ - ९५२८४९०४९०


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
sales@netwinindia.in
www.netwin.in
अधिक माहितीसाठी स्कॅन करा

50+ YEARS OF MOMENTUM

अर्थ
सहकारेण
कल्याणम्

दि कल्याण जनता
सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

# तुमच्या उच्च शैक्षणिक स्वप्नांना आर्थिक पाठबळ देणारी बँक




व्याजदर

**९.५०%* वार्षिक**

एकूण शैक्षणिक खर्चाच्या
90% कर्ज उपलब्ध.*

प्रिपेमेंट शुल्क नाही.

## कल्याण सरस्वती (शैक्षणिक कर्ज योजना)

TOLL FREE: 1800 233 1919 kalyanjanata.in KJSBank


टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
गाडी तुमची, साथ आमची
टीजेएस्बी ऑटो फायनान्स कर्ज
8.25%* द. सा. पासून
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | : 022-48897210

# अनुक्रम


✻ 'देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था होणार' –केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा.....०९
✻ रा.स्व.संघ सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची शिक्षक सहकारी बँकेला भेट...........१०
✻ वर्धा जिल्हा सहकार भारती : बैठकीत विविध विषयांवर चर्चा ..........................११
✻ सेवा कार्याला समर्पित भाग्यश्री सहकारी पतसंस्था..........................................१२
✻ सहकार भारती आयोजित कार्यकर्ता अभ्यास वर्गात संघटनात्मक बाबींबर चर्चा ........१३
✻ सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर ......................................१४
✻ सहकार भारती सांगली जिल्हा ग्रामीण कार्यकारिणी जाहीर................................१५
✻ डिजिटल युगातील नवा बदल – सेवा सुधारण्याबरोबरच अस्तित्वासाठी महत्वाचा!.........१६
✻ प्रभात ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या रोहा शाखेचे उद्घाटन..................१७
✻ पतसंस्थांसाठी सोने तारण कर्जवृद्धीची सुवर्णसंधी .......................................१८
✻ सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार : केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा ...........................................................१९
✻ भारत सरकारच्या नवीन नॉमिनेशन कायद्यातील बदल..................................२०
✻ वर्धमानसारख्या सहकारी बँकांनी उद्योजकांना आर्थिक मदत द्यावी – मुख्यमंत्री ........२१
✻ पतसंस्था व बँकिंग क्षेत्रातील क्रांती : AI आणि ML चे युग...........................२२
✻ शेतकरी केंद्रस्थानी ठेवून बाजार समित्यांनी सुविधा द्याव्या –जिल्हा उपनिबंधक सुद्रीक २३
✻ विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेने ओलांडला १०० कोटी ठेवीचा टप्पा .........२४
✻ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये बेरोजगाराची समस्या कमी करण्याची क्षमता : राष्ट्रीय बँक परिषदेत व्यापक चर्चा .....................................................२५
✻ सहकारी संस्थांची वार्षिक सभा – नियम, परंपरा आणि घटना.................... .....२६
✻ राजाराम बापू सहकारी बँकेचा १२ टक्के लाभांश जाहीर ...............................२७
✻ बँकिंग क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा – कासाचा वसा .......................................२८
✻ भारती मध्य. सहकारी ग्राहक भांडार संस्थेच्या अध्यक्षपदी विजयमाला कदम...........२९
✻ विश्वेश्वर बँकेला शेड्यूल्ड दर्जा मिळाल्याने आधुनिकतेची वाटचाल गतिमान.......३०
✻ बँकिंग व्यतिरीक्त वित्तीय कंपनी.........................................................३१


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक


'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक** – भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni



# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**जुलै २०२५ (वर्ष २१, अंक ०४)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)



**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# कृषी पतसंस्थांद्वारे सहकार चळवळ बहरणार!

जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरणाच्या काळात सहकार चळवळ अडचणीत येईल, अशी भिती व्यक्त केली जात होती. महाराष्ट्रात तर सहकार म्हणजे स्वाहाकार असे समीकरण तयार झाले होते. मात्र आता केंद्र सरकारने सहकाराला सर्वोच्च महत्त्व देऊन प्रामुख्याने ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून परिवर्तन आणण्यासाठी कंबर कसली आहे.

देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था (पॅक्स) स्थापन करण्याचे केंद्राचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी प्रत्येक गावात सहकारी संस्थांची माहिती डिजिटल डेटाबेसद्वारे संकलित करण्यात येत आहे. कृषी पतसंस्थांना केवळ कृषीपुरते मर्यादित न ठेवता, २२ नव्या सेवाक्षेत्रांशी जोडण्यात येत आहे, अशी माहिती केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी नुकत्याच मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय सहकार परिषदेत दिली आहे. केंद्राचा हा प्रयत्न अत्यंत स्वागतार्ह असून, जनौषधी केंद्रे, गॅस वितरण, पेट्रोल पंप, रेल्वे तिकीट सेवा, टॅक्सी सेवा अशा सेवा क्षेत्रांचा यात समावेश होणार आहे. याचा अर्थ, सहकाराचा बहुअंगांनी विकास करण्यात येत आहे.

महाराष्ट्रातही पॅक्स आणि एफपीओ (शेतकरी उत्पादक संस्था) यांच्या माध्यमातून विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांमुळे रोजगारनिर्मिती होत असून, शेतकऱ्यांना बाजारपेठ साखळी उपलब्ध होत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारने दिलेली उद्दिष्टे महाराष्ट्राने पूर्ण केली असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. सहकारी बँकांकडे सरकारच्या काही कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी देण्याचाही सरकारचा दृष्टिकोन असून, तो योग्यच आहे. आता सहकार क्षेत्र या सरकारी योजनांशी जोडले जाईल, त्यामुळे सरकारचा सर्वसामान्य व्यक्तिंशी सर्वदूर व थेट संपर्क वाढणार आहे. केंद्रीय सहकार मंत्रालयासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. सहकाराचा संबंध कृषी, वस्त्रोद्योग, अर्थ, मत्स्य, ग्रामोद्योग अशा जवळपास सर्वच मंत्रालयांशी, त्यांच्या खात्यांशी येतो.

देशात आठ लाख प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (पॅक्स) असून, हजारो जिल्हा व राज्यपातळीवरील सहकारी संस्था आहेत. सहकारी संस्थांचे आधुनिकीकरण करणे, इफ्को, अमूल या बड्या संस्थांच्या कार्यातील कायदेशीर अडथळे दूर करणे, ही कामे केली जात आहेत. प्राथमिक सहकारी पतसंस्थांची उलाढाल वाढावी आणि थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फर), व्याज सवलत योजना, पीकविमा योजना यांच्या अंमलबजावणीचे काम पाहणारी मध्यवर्ती संस्था म्हणून सहकार खात्याने काम करावे, अशी अपेक्षा आहे. केंद्र व राज्य सरकारच्या ४०० कल्याणकारी योजना, प्रकल्प व सेवा आहेत. हे सर्व काम प्राथमिक पतसंस्थांवर सोपवायचे झाल्यास, त्या बळकट कराव्या लागतील. हे लक्षात घेऊनच नवीन पतसंस्था स्थापन केल्या जाणार आहेत. परंतु सध्या अनेक पतसंस्था या अकार्यक्षम असून, त्यांचा राजकीय हेतूनेच वापर केला जातो. याकरिता प्रथम या संस्थांचा कारभार पारदर्शक करावा लागेल. सहकारी पतसंस्थांवर देखरेख करण्याचे काम हे नाबार्ड, रिझर्व्ह बँक आणि सहकारी खात्याने अधिक प्रभावीपणे करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व अन्य राज्यांत मिळून, देशातील सहकारी क्षेत्रात सुमारे ३० कोटी लोक गुंतले आहेत. केरळ आणि उत्तर प्रदेशमधील सहकारी क्षेत्राचा विस्तार केला जात आहे. प्राथमिक कृषी पतसंस्थांची एकूण उलाढालच आठ लाख कोटी रुपये इतकी आहे तर जिल्हा व नागरी सहकारी बँकांची उलाढाल सुमारे पाच लाख कोटी रुपयांची आहे. ही उलाढाल ३० लाख कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे सरकारचे ध्येय आहे. कार्यक्षमता व विश्वासार्हता या बाबतीत सहकारी क्षेत्राने कॉर्पोरेट क्षेत्रासोबत स्पर्धा करावी, असा यामागील हेतू आहे. सहकार चळवळीचा सकारात्मक पद्धतीने विकास करून त्याद्वारे सहकारातून समृद्धी आणण्याचे ध्येय निश्चितच पूर्ण होईल, असेच म्हणावे लागेल. सहकार चळवळीच्या माध्यमातून (प्रामुख्याने पॅक्सद्वारे) ग्रामीण भागाचा कायापालट होईल अशी आशा करायला हरकत नाही.


जय सहकार!



संपादकीय...

# ‘देशात दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था होणार’

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा




**मुंबई** – देशातील ग्रामीण भागात परिवर्तन घडविण्यासाठी ‘सहकार से समृद्धी’ या आधारे देशाच्या विविध भागात सुमारे दोन लाख नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था स्थापन करण्याचे उद्दीष्ट असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितले. यामधून अंदाजे २२ विविध प्रकारची कामे आणि ३०० योजनांचे केंद्र म्हणून पतसंस्था काम करणार आहेत असे त्यांनी नमूद केले.

‘सहकार से समृद्धी’ या राष्ट्रीय परिसंवादात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर आदी यावेळी उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की, संपूर्ण जगामध्ये सहकार क्षेत्राकडे आर्थिक व्यवस्थेची संकल्पना म्हणून पाहण्यात येत आहे तर आपल्या देशासाठी सहकार क्षेत्र हे पारंपारिक जीवनशैलीतील रुजलेले तत्त्वज्ञान आहे. एकत्र येणे, विचार करणे, काम करणे आणि एकमेकांच्या दु:खात सहभागी होणे. तसेच समान ध्येय समोर ठेवून पुढे जाणे, हा भारतीय विचार शैलीचा मुख्य धागा आहे. अन्नदाता शेतकरी बांधवांना सक्षम करण्यासाठी देशात प्रथम स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन करण्यात आले. युनोने सन २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्यादृष्टीने देशात २ लाख नवीन विविध कार्यकारी सोसायटी स्थापन करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक या राज्यांनी सहकाराच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे, असे त्यांनी नमूद केले आहे.

विविध कार्यकारी सोसायटी या केवळ कृषी क्षेत्रपुरत्या मर्यादित नाही तर नव्याने २२ सेवा क्षेत्राशी जोडण्यात येणार आहेत. यामध्ये जेनेरीक औषधे, पेट्रोल, गॅस वितरण, रेल्वे तिकीट सेवा अशा विविध सेवा यामध्ये असणार आहेत. तसेच सहकार क्षेत्राच्या माध्यमातून युवक आणि महिला यांच्यासाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सहकारातून समृद्धीकडे महाराष्ट्राची वाटचाल सुरू असून राज्यामध्ये विविध कार्यकारी सोसायटी आणि एफपीओच्या माध्यमातून विविध योजना यशस्वीपणाने राबविल्या जात आहेत. यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मितीला मिळत असून शेतकरी वर्गाला बाजारपेठेची साखळी उपलब्ध होत आहे. एका अर्थाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत आहे. केंद्र सरकारने दिलेले उद्दिष्ट राज्य अधिक सक्षमपणे पूर्ण करीत आहे.

---

# सहकार क्षेत्राच्या माध्यमातून राज्यात प्रथमच ‘उदंचन जलविद्युत प्रकल्प’




**मुंबई** – जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन आणि श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था, वारणानगर यांच्यामध्ये तिल्लारी उदंचन जलविद्युत प्रकल्पासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

महाराष्ट्राने वीजेच्या क्षेत्रात गेल्या दोन-तीन वर्षात उल्लेखनीय काम केले असून, येत्या काळात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचे महत्त्व आणि आवश्यकता वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर तिल्लारी उदंचन जलविद्युत प्रकल्प हा अपारंपारिक ऊर्जा स्रोतात भर घालणारा उपयुक्त प्रकल्प ठरणार असून, सहकार क्षेत्राच्या माध्यमातून पहिल्यांदाच अशा प्रकारचा प्रकल्प राज्यात होत आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले की, भविष्यातील वीजेचा वाढता वापर लक्षात घेता पंप स्टोरेज आवश्यक ठरणार असून, त्याची वीज गरजेनुसार आणि आवश्यक तेवढ्या प्रमाणात वापरता येते. पंपस्टोरेजची उपयुक्तता लक्षात घेऊन राज्य शासनाने या संदर्भात ६५००० मेगावॅट क्षमतेचे सामंजस्य करार केले आहेत. तसेच याला १ लाख मेगावॅट क्षमतेपर्यंत नेण्याचे नियोजन आहे. भविष्यातील पर्यायी व्यवस्था म्हणून मोठ्या प्रमाणात पारेषणात गुंतवणूक करुन सन २०३५ पर्यंत कॉरीडॉर उभे करावे लागणार आहे. त्यादृष्टीने राज्य शासन पारेषणात १ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे.

पंप स्टोरेजची भूमिका महत्वपूर्ण असणार असून पश्चिमी घाटामुळे पंपस्टोरेज निर्मितीसाठी चांगली संधी प्राप्त झाली आहे. वारणा समूहाने सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम करुन सहकारातील एक अग्रणी संस्था म्हणून वारसा निर्माण केला आहे. त्याच पद्धतीने या जलविद्युत प्रकल्पासाठी देखील ते भरीव योगदान देऊन, प्रकल्प गतिमानतेने पूर्ण करण्यात पुढाकार घेतील, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यापूर्वी १५ अभिकरणासमवेत संदर्भात सामंजस्य करार करण्यात आले असून, एकूण ४५ प्रकल्पांद्वारे ६२,१२५ मेगावॅट वीज निर्मिती तसेच ३.४१ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून ९६ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार डॉ. विनय कोरे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**तिल्लारी उदंचन जलविद्युत प्रकल्पाची माहिती**

* उदंचन जलविद्युत प्रकल्पाद्वारे २४० मेगावॅट वीजनिर्मित्ती अपेक्षित.
* १,००८ कोटींची गुंतवणूक व ३०० मनुष्यबळ रोजगार निर्मिती.
* प्रकल्पाचे वरील बाजुचे धरण कोदाळी धरण (ता. चंदगड, जि. कोल्हापूर).
* खालील बाजूचे धरण मौजे केंद्रे (ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग).
* योजनेतील पाणीसाठ्याच्या वापरासाठी प्रति जलाशय १.३३ लाख प्रति मेगावॅट वार्षिक भाडे, औद्योगिक दराने पाणी शुल्क आणि जागेचे वार्षिक भाडे आकारले जाणार.

# रा.स्व.संघ सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची शिक्षक सहकारी बँकेला भेट



**नागपूर** – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शिक्षक सहकारी बँक या शेड्यूल्ड बँकेला सदिच्छा भेट दिली आणि बँकेच्या संचालकांशी संवाद साधत बँकेची माहिती घेतली. ज्येष्ठ संचालक तसेच संचालक अनिल मुळे, विवेक जुगादे, ॲड. विनायक राजकारणे, रंजीव श्रीरामवार व मुख्य कार्यकारी अधिकारी अल्पेशकुमार जोशी यांनी स्वागत केले.

संचालक व सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री जुगादे यांनी देशातील व महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या सध्याच्या स्थितीबद्दल माहिती सांगितली. भारतीय रिझर्व बँकेच्या सध्याच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील बहुतांश नागरी सहकारी बँका या उत्तम कार्य करीत आहेत. शिक्षक सहकारी बँकेचा यंदाचा एकूण व्यवसाय १९५० कोटींच्यावर पोहोचला असून ढोबळ नफा १८.५० कोटी तर निव्वळ नफा ९.१५ कोटींपेक्षा अधिक झाला असून नेट एनपीए शून्य टक्के आहे.

बँकेची सभासद संख्या सव्वा लाखांच्यावर असून ग्राहकांना बँक तत्पर सेवा प्रदान करीत आहे. बँकेचे अध्यक्ष अनिल सोले व उपाध्यक्ष आमदार प्रवीण दटके तसेच सर्व संचालक मंडळांच्या सांघिक प्रयत्नातून बँकेने हे देदिप्यमान यश संपादन केले आहे. संघाचे महानगर कार्यवाह रविंद्र बोकारे, इतवारी भाग संघचालक संजय शिरपूरकर, रामचंद्र देवतारे, अशोक मेंढे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.


# नागपूर नागरिक सहकारी बँकेचा ६४ वा स्थापना दिन विविध उपक्रमांनी साजरा




**नागपूर** – येथील नागपूर नागरिक सहकारी बँकेचा ६४ वा स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने रक्तदान शिबिर, वृक्षारोपण आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन बँक अध्यक्ष प्रा. संजय भेंडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष पाठक यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

नेत्र तपासणी शिबिरामध्ये डॉ. आनंद देशपांडे यांनी तपासणी केली. वर्धापन दिनानिमित्त यावेळी बँकेच्या वतीने २७ लाखापेक्षा अधिक मुदत ठेवी स्वीकारण्यात आल्या. तसेच औषधीयुक्त वनस्पतींचे वृक्षारोपण करण्यात आले. बँकेच्या वतीने ग्राहक संपर्क अभियान राबविण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पतसंस्था पदविका अभ्यासक्रम समितीवर धनंजय तांबेकर



**यवतमाळ** – गोदावरी अर्बन मल्टिस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक आणि राज्य पतसंस्था महासंघ संचालक धनंजय तांबेकर यांची नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पतसंस्था व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम समितीवर निवड करण्यात आली आहे. तांबेकर यांची विषयतज्ञ म्हणून निवड करण्यात आली आहे. विद्यापीठाची नुकतीच एक बैठक झाली. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला.

## यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेला ७ कोटी ३३ लाख रुपयांचा नफा

**यवतमाळ** – नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेला ७ कोटी ३३ लाख रुपयांचा नफा झाला असून ठेवीत वाढ झाली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर यांनी सांगितली. ते म्हणाले, सदस्यांना २४२ कोटीचे कर्ज वाटप करण्यात आले असून ठेवी ३३७ कोटी ९० लाख इतक्या आहेत तर अन्य बँकामध्ये १६६ कोटी ७९ लाख रुपये गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम करण्यात येतात. सभासद आधार कुटुंब योजनेअंतर्गत निधन झालेल्या सदस्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यात येते. तसेच संस्थेच्या वतीने सदस्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त सुविधा देण्यात येतात, असे त्यांनी सांगितले. उपाध्यक्ष संजय गावंडे, सचिव संजय बिहाडे तसेच संचालक उपस्थित होते.

# वर्धा जिल्हा सहकार भारती : बैठकीत विविध विषयांवर चर्चा



**हिंगणघाट, वर्धा** – जिल्हा सहकार भारतीची बैठक नुकतीच झाली. सभेचा प्रारंभ जिल्हा परिषद एम्लाईज अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक उपाध्यक्ष रामदास खेकारे यांच्या हस्ते झाला. प्रमुख अतिथी राज्य सहकार भारती नागपूर विभाग सहप्रमुख विजय गोटे होते.

जिल्हा सहकार भारतीचे अध्यक्ष प्रभाकर कोळसे अध्यक्षस्थानी होते. बैठकीला उपाध्यक्ष तुषार गिरडे, महामंत्री श्यामकुमार खत्री, सचिव भास्कर थोटे, गजानन खाडे, मनोज पाचखेडे, प्रशांत मुळे, नंदकुमार सिंगरु पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख सुधाकर घवघवे रमेश कोहळे, सुनील पारसे, श्रीकांत दौड, अंजली पांडे, मंजीरी देशकर, अनघा मुळे, विशाल खंगन, अजय साळवे, मंगेश दाते, किशोर शोभावत, चंद्रकांत अग्निहोत्री आदी उपस्थित होते.

मुंबईतील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे झालेल्या सहकार भारती प्रदेश कार्यकारिणी बैठकीची माहिती अध्यक्ष कोळसे यांनी सांगितली. ऑनलाइन सदस्यता अभियानाबाबत श्यामकुमार खत्री यांनी माहिती सांगितली. नागपूर विभाग सहप्रमुख विजय गोटे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन श्यामकुमार खत्री मनोज पाचखेडे यांनी व आभार सुधाकर घवघवे यानी मानले.

# सहकार भारतीचे सदस्य अभियान वाढवावे - राष्ट्रीय महामंत्री दिलीप पाटील



**नंदुरबार** – सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री दिलीप पाटील यांनी नंदुरबार जिल्ह्यातील सदिच्छा भेटीत सहकार भारतीच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला पं. दीनदयाळ उपाध्याय नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात कार्यक्रम झाला. आगामी काळात व्यापक स्वरूपात बैठका घेऊन सहकार भारतीचे सदस्य अभियान वाढविण्याचे आवाहन पाटील यांनी केले. राष्ट्रीय महामंत्री पाटील यांचे स्वागत सहकार भारतीच्या महिला आघाडी प्रमुख सुरेखा वळवी जिल्हा संघटनमंत्री महादू हिरणवाळे, महिला सहप्रमुख श्रद्धा पाटील, किरण गायकवाड, प्रल्हाद भावसार, नानाभाऊ माळी आदी उपस्थित होते.

# गिरनार अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटीचा १५ टक्के लाभांश जाहीर




**नागपूर** – येथील गिरनार अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटीच्या वतीने सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. संस्थेची नुकतीच ३५ वी आमसभा झाली. त्यामध्ये सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र घाटे यांनी माहिती सांगितली.

संस्थेचे वसूल भाग भांडवल ८ कोटी, ठेवी १०० कोटी असून आर्थिक वर्षात त्यामध्ये १६.६९ कोटी इतकी वाढ झाली आहे. कर्ज ६८.८० कोटी वितरित करण्यात आले असून निव्वळ नफा ३.०५ कोटी झाला आहे. नेट एनपीए ३.४७ टक्के इतका आहे. संस्थेच्या वतीने अनेकविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. नजीकच्या काळात आणखी समाजोपयोगी उपक्रम करण्यात येणार आहेत, असे ते म्हणाले.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डिंपल घाटे यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले. सर्व प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आले. मागील सभेचे इतिवृत्त, आर्थिक पत्रक लेखा परीक्षक नियुक्ती आदी प्रस्ताव मंजूर करण्यात आले.

सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. सभेत विविध विषयांवरील ठराव मंजूर करण्यात आले. उपाध्यक्ष अविनाश इंगोले यांनी आभार मानले.

# सेवा कार्याला समर्पित भाग्यश्री सहकारी पतसंस्था

विदर्भातील अग्रगण्य नावलौकिक असलेली भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था संस्थेच्या व्यवस्थापनाने समाज व ग्राहक सेवा सर्वोच्च मानून तळमळीने काम करण्याचा संकल्प केला आहे. आगामी काळात शाखा विस्तारासह आधुनिकीकरणाची कास धरीत ग्राहक राजा ऑनलाईन पद्धतीने कर्जमागणी करून संस्थेच्या सेवा सुविधेचा लाभ घेऊ शकेल, अशा प्रकारच्या नानाविध सेवा सुविधा उपलब्ध करण्याचा मानस आहे.




चंद्रपूर जिल्ह्याच्या नवरगाव येथील भारत विद्यालयात श्री. नारायणराव लक्ष्मणराव तामशेट्टीवार मुख्याध्यापक होते. आचार आणि विचार या दोन्ही पातळीवर व्यक्तिमत्त्वाचा आदर्श जपणारे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते. संघाच्या ब्रह्मपुरी जिल्हा कार्यकारिणीत ते सेवा प्रमुख म्हणून दायित्त्व सांभाळत होते. नवरगावातील संघ स्वयंसेवकांच्या गाठी भेटी सुरू झाल्या. बैठका झाल्या तोवर एका आदर्श पतसंस्था निर्मितीचा निर्धार पक्का झाला होता. नारायणराव तामशेट्टीवार गुरुजी सर्वानुमते मुख्य प्रवर्तक झाले. सहकारी पतसंस्था निर्मितीसाठीच्या तत्कालीन निकषानुसार रुपये २० हजार भागभांडवल व २०० सभासद संख्या नोंदणी इत्यादी आवश्यक सोपस्कार पूर्ण केले. १८ जून १९९३ रोजी सहकार भारतीचे तत्कालीन अखिल भारतीय अध्यक्ष वसंतराव देवपूजारी, सहकार भारतीचे प्रमुख कार्यकर्ते दिवाकरराव राजे, बाबासाहेब नेरकर व डॉ. श्रीधरराव जोशी यांचे प्रमुख उपस्थितीत भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था संस्थेचा शुभारंभ झाला.

सक्रियतेचा वस्तुपाठ स्वतःच्या कृतीतून देणारे संस्थेचे अध्यक्ष नारायणराव तामशेट्टीवार गुरुजी व त्यांच्या नेतृत्वातील संचालक मंडळ यांच्या सक्रियतेने संस्थेची प्रगती दिवसेंदिवस अधोरेखित होत गेली. यामुळे संस्था अल्पावधीतच नावारूपाला आली. ग्राहक राजांनी प्रचंड विश्वासाने सोपविलेल्या ठेवी कर्ज रुपात वितरीत झाल्या पाहिजे, म्हणून १९९७ साली सिंदेवाही येथे दुसऱ्या शाखेचा शुभारंभ झाला. २००२ साली चिमुर येथे तिसरी शाखा सुरु झाली.

सुसज्ज मुख्यालय अत्याधुनिक सोयी सुविधा, तंत्रज्ञानांनी उपयुक्त ज्या वास्तूला पंडित दीनदयाळ उपाध्याय, सभागृहाला डॉ. हेडगेवार यांचे नाव देण्यात आलेले आहे. संस्थेचे वैचारिक अधिष्ठान अधोरेखित करणारे प्रवेशद्वाराच्या दर्शनिय स्थानी भारत माता मंदिर उभारलेले अशा वास्तूचे लोकार्पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरकार्यवाह व विद्यमान सरसंघचालक मोहन भागवत यांचे हस्ते नोव्हेंबर २००२ साली थाटात पार पडले. २००३ साली गोंडपिपरी व चंद्रपूर येथे अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या शाखेचा शुभारंभ पार पडला. संस्थेच्या वाढत असलेल्या व्यावहारिक कामाचा व्याप बघता स्वतंत्र अशी मुख्यालयाची इमारत असावी अशी आवश्यकता समोर आली आणि नवरगाव येथे स्वतंत्र प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन पश्चिम क्षेत्र संपर्क प्रमुख प्रविणभाई मणियार यांचे हस्ते २००९ साली पार पडला. संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांचे जन्मशताब्दी वर्षात इमारतीची पायाभरणी झाल्याने वास्तूला 'माधवकुंज' तर सभागृहाला स्वातंत्र्यवीर सावरकर सभागार असे नाव सार्थ नाव देण्यात आले. २०१६ साली वरोरा व ब्रह्मपुरी येथे अनुक्रमे सहाव्या व सातव्या शाखेचा शुभारंभ पार पडला.

चिमुर शाखा कार्यालयाच्या कामकाजाचा व्याप लक्षात घेऊन चिमुर येथे संस्थेची प्रशस्त वास्तू निर्माण करण्यात आली. वास्तुस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. नारायणराव तामशेट्टीवार यांचे सन्मानार्थ 'नारायण भवन' व सभागृहास 'स्व. नारायणराव तामशेट्टीवार सभागृह' असे नाव देण्यात आले. आजपर्यंतच्या वाटचालीत संस्थेने विक्रमी व्यवसाय, सुस्पष्ट व पारदर्शक अहवाल, सेवाकार्य इत्यादी कामगिरीसाठी जिल्हा व राज्य स्तरावरील अनेक पुरस्कार प्राप्त केलेले आहे.

सभासदांना भेट वस्तूंचे व आकर्षक १५ टक्के लाभांश वाटप, ज्येष्ठ व नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या सभासदांचा विविध प्रसंगी सन्मान ग्राहकांसाठी ग्राहक मेळावा, महिला मेळावा, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या ग्राहकांचा सन्मान, जास्तीत जास्त बचत करणाऱ्या महिला व विद्यार्थी ग्राहकांचा सन्मान, समाजासाठी धर्मदाय निधीतून ग्रामस्थानी बोरवेलची व्यवस्था व मंदिरांना आवश्यक साहित्य पुरवठा, विविध सामाजिक संस्थांना अर्थसहाय्य, उन्हाळ्यात शाखास्थानी पाणपोई, पूर, भूकंप तत्सम नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदतनिधी वाटप, कारागृहात रक्षाबंधन कार्यक्रम, गुणवंत व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवठा आणि सन्मान, स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन, गुंतवणूक व आयकर विषयक मार्गदर्शन, घरगुती गणपती आरास स्पर्धा, शारदा व दुर्गा मंडळांना प्रोत्साहन बक्षीस. संस्थेतील पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी व बिंदूसागर बचत प्रतिनिधींसाठी विविध प्रशिक्षण व संस्कार वर्ग, स्वच्छता कामगारांना सुरक्षा कवच किट वितरण सन्मान, कोरोना काळात अन्नधान्य खाद्य पदार्थ वितरण, स्वातंत्र्य योद्धांना रांगोळी व प्रदर्शनीद्वारे आदरांजली, पंडित दीनदयाळ उपाध्याय स्मृतीप्रित्यर्थ विविध नामवंत वक्त्यांच्या उद्बोधनाची मेजवानी सोबतच विविध आदर्श कला सेवा कार्यात वाहून घेतलेल्या साधकांचा श्रीगुरुजी जीवनगौरव पुरस्काराने सन्मान इत्यादी उपक्रम संस्थेद्वारा सुरू आहेत.

१९९३ साली २० हजार भागभांडवलानी सुरुवात झालेल्या भाग्यश्रीकडे ३१ मार्च २०२५ अखेर ग्राहक राजाच्या विश्वासाच्या ठेवी – रु. २४५ कोटी, कर्जे – रु. १८० कोटी, एकूण रु. ४२५ कोटींचा व्यवसाय आणि सुवर्ण तारण कर्ज शून्य टक्के थकित व अन्य सर्व सभासद कर्जे शून्य टक्के एनपीए अशी आर्थिक स्थिती म्हणजे ही अत्यंत सुरक्षित संस्था असल्याचे प्रमाण असल्याचे मत व्यक्त करीत आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानांनी परिपूर्ण भाग्यश्री आता नानाविध ठेव व कर्ज सुविधा कार्यान्वित करतांना जलद कर्जवितरण सह, RTGS, NEFT, UPI, मोबाईल बँकिंग इत्यादी प्रभावी सेवा देत आहे. भाग्यश्री परिवाराच्या संचालनाची धुरा सद्यस्थितीत संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मी, उपाध्यक्ष गोविंद बिसेन, सहसरव्यवस्थापक दत्ता बहादुरे यांचे कार्यकुशल नेतृत्वात संस्थेचे समस्त संचालक, अधिकारी, कर्मचारी व बिंदूसागर बचत प्रतिनिधी वृंद सांभाळत आहेत.

**– आतीश आनंदराव कानापुरवार, चंद्रपुर.**
**मोबाइल नं. – ९४२१८ १४०८३**

*****

# सहकार भारती आयोजित कार्यकर्ता अभ्यास वर्गात संघटनात्मक बाबींबर सविस्तर चर्चा




**सांगली** – सहकार क्षेत्रात संस्कार रुजवण्यासाठी व हे क्षेत्र मजबूत करण्यासाठी जागरूक राहून कार्य करण्याचे आवाहन सहकार भारतीचे संस्थापक सदस्य व भारतीय रिझर्व बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी केले. सहकारातून विकसित भारत यावर त्यांनी सविस्तर विवेचन केले.

कोल्हापूर विभाग सहकार भारतीच्या वतीने दोन दिवसीय कार्यकर्ता अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले. अभ्यास वर्गाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोल्हापूर विभाग सहसंघचालक भगतराम यांच्या हस्ते झाले. यावेळी आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे यांच्या अध्यक्षस्थानी होते.

सध्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहकार क्षेत्राचे फार मोठे स्थान आहे आणि ही अर्थव्यवस्था अधिक बळकट करायची असेल तर सहकारी संस्थांच्या माध्यमातून हे कार्य अधिक सुलभपणे होऊ शकते. त्यासाठी नवनवीन सहकारी संस्था स्थापन करण्यावर त्यांनी भर दिला.

सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, प्रदेश महिला प्रमुख वैशाली आवाडे, प्रदेश पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख सागर चौगुले, प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन, प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष अरविंद मजलेकर उपस्थित होते.

अभ्यास वर्गात सहकार चळवळीशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यकर्त्यांना संघटन, सहकारी मूल्ये, बँकिंग व्यवस्थापन, दूध डेअरी तसेच सामाजिक बांधिलकी या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हा कार्यकारणी पदाधिकाऱ्यांसह विविध सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ उपस्थित होते. अभ्यास वर्गास सांगली कोल्हापूर सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांमधील कार्यकर्ते उपस्थित होते. अभ्यास वर्गाच्या यशस्वीतेसाठी कोल्हापूर विभाग प्रमुख चंद्रकांत धुलप, सहप्रमुख जवाहर छाबडा, अभ्यास वर्ग प्रमुख सागर चौगुले यांनी परिश्रम घेतले.

## बुलढाणा अर्बन क्रेडिट सोसायटीचा ४० वा स्थापना दिवस उत्साहामध्ये साजरा

**पुणे** – बुलढाणा अर्बन क्रेडिट सोसायटीचा ४०वा स्थापना दिवस उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध मराठी नाटकांचे सादरीकरण बालगंधर्व रंगमंदिर येथे करण्यात आले. कार्यक्रमाला सोसायटीचे ग्राहक खातेदार संचालक अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते. सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी मनोगतात सोसायटीच्या वाटचालीची माहिती सांगितली.

## जनता अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक तज्ञ संचालकपदी सीए विनय लोखंडे, विठ्ठल कदम

**वाई** – येथील जनता अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक तज्ञ संचालकपदी सीए विनय लोखंडे आणि विठ्ठल कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बँकेचे संस्थापक संचालक सुरेश कोरडे यांनी ही माहिती सांगितली. ते म्हणाले, बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असून बँक सर्व निर्बंधातून बाहेर आली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी व्याज दर साडे आठ टक्के तर सुपर सीनियर सिटिझनसाठी ८.६० टक्के व्याज दर करण्यात आला आहे. यावेळी त्यांनी बँकेच्या विविध योजनांची माहिती सांगितली. यावेळी बँकेचे संचालक, अधिकारी उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींसाठी राज्यात पतसंस्था सुरू करणार - सहकार आयुक्त दीपक तावरे



**पुणे** – राज्यातील लाडकी बहीण योजनेच्या अनुषंगाने आता शासनाच्या वतीने लाडक्या बहिणींसाठी पतसंस्था सुरू करण्यात येणार आहेत. महिलांच्या सहभागातून या पतसंस्था कार्यरत राहणार आहेत. अंदाजे दीड लाखाच्या भांडवलावर या पतसंस्था सुरू करता येणार आहेत, अशी माहिती सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितली.

ते म्हणाले, तालुका आणि जिल्हा पातळीवर सदस्य संख्या ५०० ते १५०० अशी नक्की करण्यात आली आहे. पतसंस्था स्थापनेच्या माध्यमातून बचत गुंतवणूक आणि स्वाइन रोजगाराची उपलब्धता वाढणार आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी या पतसंस्था उपयुक्त ठरणार आहेत. ग्रामीण भागात पतसंस्था सुरू करण्यासाठी प्राथमिक सदस्य संख्या २५० नक्की करण्यात आली आहे तर भांडवल दीड लाख असावे लागणार आहे तर तालुका पातळीवर सदस्य संख्या ५०० असेल. तसेच भांडवल ५ लाख आणि जिल्हा स्तरावर सदस्य संख्या १५०० आणि भांडवल दहा लाख रुपये ठरविण्यात आले आहे. शहरी भागात निकष वेगळे असणार आहेत असे नमूद करून ते म्हणाले, सदस्य संख्या १००० आणि भांडवल १५ लाख रुपये ठरविण्यात आले आहे आणि महानगरपालिका परिसरात सदस्य ८०० आणि भांडवल १० लाख तसेच असणार आहे. तसेच मोठ्या शहरात निकष वेगळे असणार आहेत असे ते म्हणाले.

# सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर



**पंढरपूर** – सहकार भारती पंढरपूर जिल्हा अध्यक्षपदी सीए राजेंद्र विलास बजाज यांची शिवानंद बोरामणी यांची महामंत्रीपदी तर ॲड. बिचुकले यांची संघटन प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे संघटक शरद जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व विभाग प्रमुख संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली. सहकारी साखर कारखाना जिल्हा प्रकोष्ठपदी उमेश परिचारक यांची निवड करण्यात आली.

दीपप्रज्वलन व सहकार गीताने सुरुवात झाली. दुग्ध प्रकोष्ठप्रदेश प्रमुख उमेश विरधे यांनी स्वागत व परिचय करून दिला सहकार भारतीचे संस्थापक लक्ष्मणराव इनामदार व सहकार तपस्वी सुधाकरपंत परिचारक यांना अभिवादन करून सहकार भारती या संस्थेच्या वाटचालीचे अवलोकन केले.

संघटन प्रमुख जाधव यांनी सहकाराच्या वाढत्या भूमिका, केंद्रीय सहकार मंत्रालय तसेच 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' या उपक्रमांतील सहकार क्षेत्राचे योगदान विषद केले. विविध प्रशिक्षण उपक्रम व उद्योग संधींची माहिती देत सहकार चळवळीचे भविष्य भक्कम असल्याचे ते म्हणाले.

पांडुरंग साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष दिनकर मोरे, पंढरपूर बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, जिल्हा संघचालक डॉ. रमेश सिद, युवक नेते प्रणव परिचारक, करमाळ्याचे कन्हैयालाल देवी, सुरज रोंगे, सहकार भारतीचे गिरीश भवाळकर विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक सहविभाग प्रमुख नाना वाघमोडे, सूत्रसंचालन विशाल तपकीरे आणि नियोजन गणेश हरिदास यांनी केले.

## विश्वेश्वर सहकारी बँकेला शेड्यूल्ड दर्जा प्राप्त – देशातील ५० वी बँक ठरली

**पुणे** – सुवर्ण महोत्सव साजरा करणाऱ्या विश्वेश्वर सहकारी बँकेला नुकताच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शेड्यूल्ड दर्जा दिला आहे. यापूर्वी बँकेला मल्टिस्टेट बँकेचा दर्जा प्राप्त झाला आहे. बँक अध्यक्ष अनिल गाढवे यांनी पत्रकारांना सांगितले. बँकेने प्रगतीच्या वाटचालीत सातत्य राखल्याने आणि आरबीआयच्या निकषाचे पालन केल्याने बँकेस हा बहुमान मिळाला आहे. शेड्यूल्ड दर्जा प्राप्त करणारी पुण्यातील तिसरी आणि देशातील ५० वी बँक आहे, असे त्यांनी सांगितले.

शेड्यूल्ड दर्जा बँकेला मिळाल्याबद्दल खातेदार, ग्राहक तसेच हितचिंतकांनी बँकेच्या संचालक मंडळाचे तसेच पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

गेली अनेक वर्षे बँकेला लेखापरीक्षणात 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे असे नमूद करून ते म्हणाले, आरबीआयकडून प्राप्त झालेल्या दर्जामुळे रिफायनान्सची सवलत मिळणार आहे. तसेच नगरपालिका, निमसरकारी संस्था धर्मादाय संस्था यांच्याकडून ठेवी स्वीकारता येतात. हायर पर्चेसची कर्ज करता येतात. तसेच परदेशी बँकेबरोबर करार करून आयात निर्यातीचे व्यवहार सुरू करता येतील, यासारखे अनेक फायदे मिळणार आहेत.

सध्या बँकेच्या ठेवी २२०० कोटी असून आगामी वर्षभरात २५०० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कर्जे १५३८ कोटी असून एकूण व्यवसाय ३७६८.८७ कोटी आहे. भाग भांडवल ६१.३० आणि सीआरएआर १५.१३ टक्के आहे. सध्या ३० शाखा कार्यरत असून नेट एनपीए २.०८ टक्के इतका आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

## राजगुरूनगर सहकारी बँक आर्थिकदृष्ट्या सशक्त

**पुणे** – जिल्ह्यातील राजगुरूनगर सहकारी बँक आरबीआयच्या नियमांनुसार आर्थिकदृष्ट्या सशक्त आणि सुव्यवस्थित बँक झाली असून यामुळे बँकेच्या व्यवसाय वाढीला अधिक गती मिळणार आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष दिनेश ओसवाल यांनी सांगितली. बँक संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये अध्यक्ष ओसवाल यांनी माहिती सांगितली.

ग्राहक हिताच्या सोयीसाठी इंटरनेट बँकिंग सुविधा देण्याबाबत एक प्रस्ताव आरबीआयकडे पाठविण्यात येणार आहे. तसेच बँकेला शेड्यूल्ड बँक दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न सुरू आहे. बँकेचा व्यवसाय २९५२ कोटींचा पूर्ण झाला आहे. नजीकच्या काळात तीन हजार कोटींचा व्यवसाय पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. सलग दुसऱ्या वर्षी बँकेने नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. बँकेची नुकतीच १८ वी शाखा सुरू करण्यात आली आहे. वर्षभरात आणखी दोन शाखा सुरू करण्यात येणार आहेत. बँकेने रोजच्या व्यवहारात अत्याधुनिक तंत्रज्ञानावर अधिक भर दिला आहे अशी माहिती त्यांनी सांगितली.

## मामासाहेब पवार बँक अध्यक्षपदी प्रशांत पवार, उपाध्यक्षपदी रावसाहेब वाकळे

**सांगली** – येथील मामासाहेब पवार बँक अध्यक्षपदी प्रशांत पवार आणि उपाध्यक्षपदी रावसाहेब वाकळे यांची निवड करण्यात आली आहे. आमदार जयंत पाटील, बँकेचे माजी अध्यक्ष आणि राजाराम बापू सहकारी साखर कारखान्यांचे संचालक बाळासाहेब पवार, आधी पदाधिकारी उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विनय शिंदे यांनी काम पाहिले. दोन्ही पदांसाठी एकेक अर्ज दाखल झाले होते. नूतन पदाधिऱ्यांचे अधिकारी आणि ग्राहकांनी अभिनंदन केले आहे.

# सहकार भारती सांगली जिल्हा ग्रामीण कार्यकारिणी जाहीर




**सांगली** – सहकार भारती सांगली जिल्हा ग्रामीणच्या वतीने ढालगाव जिल्हा कार्यकारिणी बैठक, संवाद मेळावा झाला. यावेळी जत कवठेमंकाळ आटपाडी कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

सहकार भारतीचे प्रदेश संघटक संजय परमने यांच्या अध्यक्षतेखाली व सांगली जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष सुमंत महाजन यांच्या उपस्थितीमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सारिका मुळीक यांनी केले. स्वागत स्वराज्य फाउंडेशनचे प्रायोजक व स्वराज्य पतसंस्थेचे अध्यक्ष सहकार भारतीचे जिल्हा सदस्य अजित खराडे यांनी केले. गुलाब पुष्प वृक्षाला पाणी घालून व्यासपीठावरील उपस्थितांच्या हस्ते उद्घाटन व भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सहकार गीत सादर सहकार भारती जिल्हा ऑडिट प्रकोष्ठ प्रमुख दत्तात्रय स्वामी यांनी केले.

बैठकीत जत, कवठेमहांकाळ, आटपाडी तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली. नूतन बैठकीत प्रदेश संघटक परमणे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, येणारा काळ उज्वल आहे. सहकारात धाडसी निर्णय घेतल्याशिवाय त्यांची प्रगती नाही, सहकार टिकला पाहिजे, रुजला पाहिजे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. ठेवीदार हा संस्थेचा दुवा असून त्याचे ठेवीचे पैसे सुरक्षितता आपण सर्वांनी सांभाळली पाहिजे, असे मत व्यक्त केले. नरसोबाची वाडी या ठिकाणी सहकार भारतीतील कार्यकर्त्यांचा अभ्यास वर्गाची माहिती दिली. प्रत्येक तालुक्यातील किमान पाच सदस्याने आपले नाव नोंदणी करावी व अपूर्ण राहिलेल्या तालुक्यातील कार्यकारणी तेथील पदाधिकाऱ्यांनी या अभ्यास वर्गांपूर्वी पूर्ण करावी असे सांगितले.

समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सहकार भारतीच्या वतीने परमने यांचा शाल व देऊन सत्कार करण्यात आला. कार्यकारणीच्या निवडीनंतर चंद्रकांत दौंडे विक्रम कोळेकर, प्रतिभा दबडे, विकास भुते यांनी मत व्यक्त केले. प्रकोष्ठ प्रमुख व आदर्श को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे सचिव दत्तात्रय स्वामी यांनी सहकार भारतीचे कार्य, कामकाज, प्रशिक्षण तर महामंत्री भारत निकम यांनी मार्गदर्शन केले. आभार सारिका मुळीक यांनी मानले.

# सहकारी बँकासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी सहकार पाठशाला सुरू

**पुणे** – नागरी सहकारी बँकांसाठी अद्ययावत माहिती तंत्रज्ञान संबंधित सुविधा पुरविण्यासाठी त्याचप्रमाणे वरिष्ठ पदावरील कुशल मनुष्यबळ तयार करण्याचे विविध उपक्रम राबविण्याचे काम सहकार पाठशालेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या सहकार पाठशाला उपक्रमाची नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे.

कॉसमॉस सहकारी बँक सभागृहात बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे एनयूसीएफडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी पद्मभूषण बहादुरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. नजीकच्या काळात देशपातळीवर नागरी सहकारी बँकासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येणार आहे.

यावेळी टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांच्या हस्ते सहकार पाठशालेच्या डिजिटल लर्निंग मंचाचे उद्घाटन करण्यात आले. सध्या ही सुविधा इंग्रजी भाषेत असून लवकरच अन्य स्थानिक भाषेत उपलब्ध करण्यात येणार आहे.

# वाई अर्बन बँकेला राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांची भेट





**वाई** – येथील वाई अर्बन बँकेला नुकतीच राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली. बँक अध्यक्ष अनिल देव, उपाध्यक्ष डॉ. शेखर कांबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीपाद कुलकर्णी यांनी खासदार कुलकर्णी यांनी स्वागत करून कामकाजाची माहिती सांगितली. खासदार कुलकर्णी म्हणाल्या की, बँकेला मोठी परंपरा असून बँकेची आर्थिक स्थिती भक्कम आहे. बँकेचे संचालक मंडळ कामकाज चांगल्या पद्धतीने चालवीत असून ठेवीदारांच्या हितास प्राधान्य देण्यात येत आहे, हे नक्की स्वागतार्ह आहे. याबद्दल त्यांनी संचालक मंडळ आणि अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# लोकमान्य मल्टिपर्पज वतीने रेनकोटची सुविधा उपलब्ध

**पुणे** – येथील लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीच्या वतीने पोलिस उपायुक्त कार्यालयात रेनकोटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोसायटीचे पुणे विभागीय प्रमुख सुशील जाधव यांनी झोन तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्याकडे समारंभपूर्वक रेनकोट सुपूर्द केले. प्रशासन प्रमुख सचिन होडगे तसेच पोलिस अधिकारी उपस्थित होते.

तसेच सोसायटी आणि अक्सिस मॅक्स लाईफ इन्शुअरन्स यांच्यामध्ये बेळगाव येथे कॉर्पोरेट एजन्सी करार नुकताच करण्यात आला. या करारामुळे सोसायटीच्या सदस्यांना या नवीन जीवन विमा संरक्षण योजनेचा लाभ घेता येणार आहे. सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत दिक्षित उपस्थित होते.

# डिजिटल युगातील नवा बदल सेवा सुधारण्याबरोबरच अस्तित्वासाठी महत्त्वाचा!



अजित भाले
८००७७ ५५४५५

**लेखांक ६**

अनेकदा दैनंदिन जीवनात रगाड्यात आपण थोडं थबकतो. मागे वळून बघतो. विचारातही पडतो – आपण जिथं पोहोचलो आहोत, तिथं खरंच यायचं होतं का? की चालता चालता एखाद्या जुन्या सवयीच्या रस्त्यावरच अडकून पडलो आणि इथवर पोचलो? अशीच काहीशी अवस्था अनेक सहकारी बँकांची झाली आहे. सगळं सुरळीत असल्यासारखं वाटतं, काम चालू असतं, पण कुठंतरी एक स्थिरावलेपणाची जाणीव होते – की जिथं नव्याने काही घडत नाही, जुनं जे होतं तेच परत परत घडतं. ते छानच असले पाहिजे, नव्हे आहेच. पण जे आजमितीला योग्य आहे ते यापुढेही असेल? कदाचित नाही.

सहकारी बँकांची परंपरा ही माणसांमध्ये रुजलेली, नात्यांवर आधारलेली, विश्वासातून उभी राहिलेली आहे. चळवळीची फांदी आहे. आजपर्यंत ओळखीचा गंध असल्याकारणाने संशयाला स्थान नसायचं. आज समाज झपाट्याने बदलतो आहे. नोकरीची ठिकाणे, व्यवसायाचे व्याप, त्यांच्या गरजा झपाट्याने बदलत आहेत. विशेषतः तरुण पिढीची बँकिंगकडे बघण्याची दृष्टीच बदलली आहे. तिला सहज सेवा हवी असते – तीही लगेच. निर्णय हवा असतो – तोही पारदर्शक. आणि ती व्यवस्था हवी असते – जी तिच्या आयुष्याशी सुसंगत वाटेल, म्हणजे डिजिटल, मोबाइलवर चालणारी आणि झटपट काम करणारी.

सहकारी बँकांकडे अजूनही अनेक ठिकाणी अर्ज मागवायचा, कागदं गोळा करायची, सह्या घ्यायच्या, मग फाइल पुढे सरकवायची अशी प्रक्रिया आहे. ग्राहक वृद्ध असला तरी त्याला पुन्हा शाखेत बोलावलं जातं. याला अनेक बँका अपवाद आहेत पण बरेच ठिकाणी स्टाफ अभावी घरपोच सेवा देणे अशक्यप्राय असते. तरुण ग्राहकाला ही प्रक्रिया संथ, गुंतागुंतीची वाटते. तो दुसरीकडे वळतो. दुसऱ्या बँकांना जवळ करतो. हा बदल आपल्या लक्षात येतेय त्याला सामोरं कसं जायचं, याचं उत्तर मात्र प्रत्येक बँक नव्याने शोधत राहते. बदलत्या काळाच्या ओघात सहकारनेच सहकारी बँकाच्या नवीन बदलाच्या प्रक्रिया तयार होता आहेत आणि होत राहायला हव्या.

काही नवीन शक्यता उभ्या राहतात. त्यातलीच एक म्हणजे डिजिटल कन्सेंट मॅनेजर. नाव थोडंसं तांत्रिक वाटेल, पण कल्पना अगदी सोपी आहे. ग्राहक आपल्या मोबाईलवरून, एका होकाराच्या माध्यमातून, ग्राहक बँकेला आपल्या आर्थिक माहितीचा अधिकृत, सुरक्षित आणि कायदेशीर प्रवेश देऊ शकतो. बँक खातं, व्यवहार, कर्ज हप्ते, गुंतवणूक, कर माहिती इत्यादी सर्व येतं. हे सगळं एका कागदाशिवाय, काही मिनिटांत. यामुळे बँकेची कार्यक्षमता वाढून ती अधिक जलद निर्णय घेऊ शकते. ग्राहकाचा मजल दरमजल करीत कागदपत्रे आणायचा वेळ वाचतो. आणि सर्वात महत्त्वाचं – बँक आणि ग्राहक यांचा परिचय नसून देखील यामुळे दोघांचाही विश्वास वाढण्यास मदत मिळते.

डिजिटल युगातील नवा बदल केवळ सेवा सुधारण्यासाठी नाही तर तो अस्तित्त्वासाठी देखील आहे हे लक्षात घेतले पाहिजे. कारण जर बँक ही काळाच्या मागे राहिली तर तिच्याभोवतीचे जगही हळुहळू बँकेपासून व्यवहार दूर घेऊन जाऊ लागते. म्हणून आज जी बँक स्वतःला पारंपरिक आणि स्थानिक म्हणते, तिलाच सर्वात आधी तंत्रज्ञानाची गाठ घालायला हवी. कारण सहकाराचा आत्मा टिकवून ठेवत अधुनिकतेचा हात धरायचा असेल, तर तो हात शोधून तसेच परिस्थितीच्या अभ्यासाअंती घ्यावा लागेल.

डिजिटल कन्सेंट मॅनेजर हे केवळ एक साधन नाही, तर हे त्या नवीन परिघाला उघडीप देणाऱ्या दिशेचं दार आहे. ते उघडणं म्हणजे आपल्या बँकेला नव्यानं ओळख देणं. हा बदल करताना थोडा वेळ लागेल, थोडं शिकावं लागेल. त्यातून मिळणारी गती, पारदर्शकता आणि ग्राहकांचं समाधान – ही अशी गुंतवणूक आहे, जी बँकेचे उद्याचं स्वरूप ठरवू शकते. बदल ही सक्ती नाही, नसावीही. पण जेव्हा बदल तुमच्या दाराशी येऊन उभा ठेवतो, तेव्हा त्याच्याकडे पाठ फिरवणं ही येणाऱ्या काळात संधी गमावणं ठरू शकतं. आणि म्हणूनच, ही वेळ आहे स्वतःकडे बघायची,आतल्या अंतर्गत, थबकलेल्या गोंधळाला ओळखायची आणि त्या वळणावर, ज्यावर आपण सध्या उभे आहोत, तिथून पुढे जायचं ठरवायची. जिथे विचार थांबतो, तिथे प्रवासही थांबतो. जिथं बदल स्वीकारला जातो, तिथं पुन्हा नवी वाट तयार होते. अशाच एका नव्या डिजिटल वाटेवर सहकारी बँकासाठीची नवी संधी खुणावत आहे.

**– अजित भाले, संस्थापक, मेट्टारेव सिस्टीम्स, पुणे**
Mettarev System.s Email- ajit.bhalemettarev.com

*****

व्यापारी मित्र अमृतवर्ष 25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | २५०० | १७०० | ९०० |
| रजिस्टर पोस्टाने | ३६०० | २४०० | १२६० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# प्रभात ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या रोहा शाखेचे उद्‌घाटन



**रायगड** – मुरुड तालुक्यातील प्रभात ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थाच्या रोहा येथील नूतन शाखेचे उदघाटन आदर्श पतसंस्था संस्थापक अध्यक्ष तथा राज्य महासंघाचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

सीए सतिश मेढी, आरजे गृपचे उद्योजक राजू शेठ, पतसंस्थेचे संस्थापक ॲड. नरेश घाग, अध्यक्ष प्रवीण घाग, माजी अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष नितीन डाके, ॲड. सचिन पाटील, कोषाध्यक्ष अनिल पाटील उपस्थित होते.

उदघाटन करताना पाटील म्हणाले की, राज्यातील अर्थकारणात पतसंस्थेची भूमिका महत्वाची असून तळागाळातील गरजूंना आर्थिक सहकार्य करीत आहेत. फायनान्स देणाऱ्या कंपन्यांपेक्षा सर्वसामान्यांना वाजवी दरात पतपुरवठा पतसंस्था करीत असतात. त्याचा कर्जदारांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

# रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्षपदी ॲड. जे. टी. पाटील, उपाध्यक्षपदी दिलीप जोशी

**रायगड** – रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघाच्या ॲड. जे. टी. पाटील यांची अध्यक्षपदी, दिलीप जोशी यांची उपाध्यक्षपदी तर योगेश मगर यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली. ही निवड आगामी पाच वर्षांसाठी असणार आहे.

संचालक मंडळाची बिनविरोध निवड यापूर्वी करण्यात आली. ॲड. जे. टी. पाटील (अलिबाग), दिलीप जोशी (मुरुड -जंजिरा), योगेश मगर (वेश्वी अलिबाग), अमित ओझे (पनवेल), सुनील दामले (अलिबाग), जगदीश कवळे (श्रीबाग अलिबाग), ॲड. मिलिंद चव्हाण (श्रीबाग, अलिबाग), अशोक प्रधान (अलिबाग), दिलीप पटेल (रेवदंडा), गणेश म्हात्रे (धाकटे भोम चिरनेर), चंद्रशेखर जोशी (रोहा), हेमंत पाटील (उरण), प्रमोद पाटील (अलिबाग), ॲड. अच्युत पाटील (वाशी-पेण), चंद्रकांत घोसाळकर (पाली, सुधागड), प्रकाश चांदिवडे (कळंबोली), ॲड. के. एस. पाटील (नवीन पनवेल), निजामुद्दीन कागदी (साई, माणगाव), ॲड. कविता ठाकूर (अलिबाग), सौ. उषा चांदगावकर (रोहा), संजय वानखेडे (पिंपळभाट, अलिबाग). सहकार ही चळवळ आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक बांधिलकीची असून, महासंघाच्या माध्यमातून पतसंस्थांना बळकटी, पारदर्शकता व विश्वासार्हतेचे अधिष्ठान देणे, हेच आमचे मुख्य ध्येय आहे. अशी प्रतिक्रिया नूतन अध्यक्ष पाटील यांनी व्यक्त केली.

## जोगेश्वरी नागरिक सहकारी पतसंस्थेचा ५२ वा वर्धापन दिन साजरा

**मुंबई** – जोगेश्वरी नागरिक सहकारी पतसंस्थेचा ५२ वा वर्धापन दिन संस्थेच्या कार्यालयात मोठ्या उत्साहात जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने सभासद ठेवीदार यांना आर्थिक व्यवहाराची माहिती थेट मोबाईलवर मिळावी, यासाठी संस्थेने अधिकृत मोबाईल ॲपचे उद्घाटन करण्यात आले.




प्रमुख पाहुणे सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशचे सचिव व मालाड सहकारी बँकेस संचालक सीए भूषण पैठणकर यांच्या हस्ते 'मोबाईल ॲप'चे लोकार्पण करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष संजय क्षिरसागर आणि संचालक ठेवीदार, सभासद, कर्मचारी वर्ग तसेच सहकार सुगंधचे प्रतिनिधी गणेश खिलारे उपस्थित होते.

## गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण यशस्वी

**पालघर** – सहकार भारती, सहकारी प्रशिक्षण संस्था, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकारी यांच्याकरिता एकदिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. मुख्य वक्ते नितीन देशपांडे व अजय गुजराती यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधला. आचार्य आनंद यांनी योगाचे महत्त्व सांगितले. प्रशांत पाटील यांनी फेडरेशनचे सभासद होण्यासाठी आवाहन केले. प्रशिक्षणासाठी मनिषा राऊत, कौमुदी काळे, मीनल वैद्य, अण्णा चोरघडे, संकेत कुडू, शेखर गायकवाड यांचे सहकार्य लाभले.

## डोंबिवली नागरी बँकेला आर्थिक वर्षात ४३.६४ कोटी निव्वळ नफा

**डोंबिवली** – डोंबिवली नागरी सहकारी बँकेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ४३.६४ कोटी रूपयांचा निव्वळ नफा झाला. ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असल्याची माहिती बँकेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सांगण्यात आली. बँक अध्यक्ष गणेश धारगळकर यांनी बँकेच्या आर्थिक प्रगतीबाबत सविस्तर माहिती सांगितली.

ते म्हणाले, बँकेच्या ठेवी ४०५२ कोटी इतक्या झाल्या असून कर्ज वितरण २३१३ कोटी इतके झाले आहे. बँकेच्या एकूण व्यवसायात २१९ कोटी रुपयांची भर पडली असून ६३६५ कोटी इतका एकूण व्यवसाय झाला आहे. ग्रोस एनपीए १.१० टक्के तर नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळाले आहे. बँक सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. नजीकच्या काळात बँकेच्या वतीने मध्य प्रदेशात आणि सोलापूर जिल्ह्यात येथे बँकेची शाखा उघडण्यात येणार आहे. बँकेच्या वतीने ग्राहकांना डिजिटल सुविधा देण्यात येत आहेत, अशी माहिती यावेळी सांगण्यात आली. संचालक, अधिकारी आणि ग्राहक सभेसाठी उपस्थित होते.

# पतसंस्थांसाठी सोने तारण कर्जवृद्धीची सुवर्णसंधी

सोनेतारण कर्ज हा पूर्वापार मुख्यत्वे सावकारीच्या माध्यमातून चालत आलेला कर्ज व्यवसाय असून, अजूनही तो अपेक्षित प्रमाणात सावकारी जाचातून कमी झालेला नाही. सहकारी संस्थांचा उदय झाल्यानंतर शेती अथवा बिगर शेती कर्जासाठी तातडीने उपलब्ध होणारा कर्जाचा मार्ग या दृष्टीने सर्वसामान्य लोकांनी सहकारी संस्थांकडे सोनेतारण कर्ज व्यवहार करण्यास सुरुवात केली. अगदी सुरुवातीच्या काळात राष्ट्रीयीकृत अथवा खासगी बँका या व्यवसायाशी फारशा संबंधित नव्हत्या. नागरी सहकारी, जिल्हा बँका व पतसंस्था यांचा सोने तारण कर्ज हा एके काळी प्रमुख व्यवसाय होता. या व्यवसायामध्ये हळुहळू राष्ट्रीयीकृत व खाजगी बँकांनीदेखील शिरकाव केला. एन.बी.एफ.सी. यांनी विशेषतः केवळ सोने तारण याच एकमेव कर्ज व्यवहारावरती लक्ष केंद्रित करून या व्यवसायात मोठ्या प्रमाणात व्यवसाय वृद्धी केली.




गणेश निमकर
९८२२५ ६८५५०


रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या नियंत्रणामध्ये असणाऱ्या सर्व आर्थिक संस्थांसाठी सोने तारण व्यवहाराबाबत यापूर्वी वेगवेगळे निकष व निर्देश होते. सोनेतारण कर्ज व्यवहारांमध्ये असणाऱ्या अनियमिततेसंबंधी रिझर्व बँकेने यापूर्वीदेखील वेळोवेळी त्यांच्या नियंत्रणामध्ये असणाऱ्या सर्व आर्थिक संस्थांना स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना केल्या होत्या.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने दिनांक ६ जून २०२५ रोजी सोने तारण कर्जाच्या बाबतीत एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. या परिपत्रकानुसार रिझर्व बँकेने त्यांचे अखत्यारीत असणाऱ्या सर्वच आर्थिक संस्थासाठी सोनेतारण कर्ज व्यवहाराच्या बाबतीत समान व एकसारखे निकष आणि निर्देश जारी केले आहेत. थोडक्यात या कर्ज व्यवहारासाठी सर्वच आर्थिक बँका व एन.बी.एफ.सी. या एकाच पातळीवर आणल्याने सर्वांसाठी हे निकष आता एकच राहणार आहेत.

यापुढे या रिझर्व बँकेच्या नियंत्रणात असणाऱ्या सर्व आर्थिक संस्थांमधील आजपर्यंत असणारी कर्ज व्यवहारांमधील असमानता दूर होणार असून त्यांची आपापसातील स्पर्धा कमी होईल. नागरी सहकारी पतसंस्थाचे दृष्टीने मात्र स्पर्धक संख्या कमी होईल.

या परिपत्रकाचा बारकाईने अभ्यास केल्यास यात काही गोष्टी या आर्थिक संस्थांच्या हिताच्या आहेत. तसेच अनेक बाबतीत रिझर्व बँक ऑफ इंडियाने या कर्ज व्यवहारांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या अनेक नियंत्रणे, निर्बंध तसेच अधिक सुरक्षितता आणि पारदर्शकतादेखील आणलेली आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियाने हे परिपत्रक जारी करताना यापूर्वी या संदर्भातील असणारी सर्व परिपत्रके रद्द केलेली असल्याने या परिपत्रकांमध्ये जोपर्यंत बदल होत नाही तोपर्यंत याच परिपत्रकातील सूचना या सर्वच बँका व एन.बी.एफ.सी. यांना लागू राहतील.

या परिपत्रकामुळे रिझर्व बँक ऑफ इंडियाने सोने तारण व्यवसाय करत असताना आर्थिक संस्थांनी सर्वसामान्य कर्जदारासाठी अधिक हिताची कर्ज योजना राबवावी, असे सुचवले आहे. यापूर्वी तारण मूल्याच्या किती रक्कम द्यावयाची (रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या संकल्पनेप्रमाणे एल.टी.व्ही. - लोन टू व्हॅल्यू म्हणजेच कर्जाचे मूल्यांकनाशी गुणोत्तर प्रमाण) हे सरसकट ७५ टक्के ठेवलेले होते. आता रिझर्व्ह बँकेने यात बदल केला असून रुपये २.५० लाखांपर्यंत कर्ज व्यवहार असल्यास हे प्रमाण ८५ टक्के केले असून रुपये २.५० लाखाचे वर परंतु रुपये ५ लाखांपर्यंत ८० टक्के तर रुपये ५ लाखांपुढील कर्ज व्यवहार असल्यास ते ७५ टक्के केले आहे. याचा अर्थ लहान रकमेच्या कर्जदारांसाठी अधिक कर्ज रक्कम मिळण्याची सोय रिझर्व्ह बँकेने केलेली आहे. याचा नेमका परिणाम असा होणार आहे की, बँका आणि एन.बी.एफ.सी. यांना यापुढे लहान कर्जदारांसाठी ऑनगोईंग पद्धतीने म्हणजेच दरमहा नावे पडणाऱ्या व्याज रकमेसह येणाऱ्या एकत्रित एलटीव्ही रकमेचे रोजच्या रोज प्रमाण राखण्यासाठी व्याजदर कमी करावे लागतील. नागरी सहकारी पतसंस्थांच्या बाबतीत मात्र अशा प्रकारचे कर्जनिहाय बदलते एलटीव्हीचे प्रमाण अद्याप तरी ठरवलेले नाही.

नागरी सहकारी पतसंस्थांच्या बाबतीत सध्या सरसकट ७५ टक्के एलटीव्हीचे बंधन आहे. सर्व बँका व एन.बी.एफ.सी. यांचे एन.पी.ए. निकष तसेच आणि पतसंस्थाचे एन.पी.ए. निकष यामध्ये असणारे बदल किंबहुना पतसंस्थांना याबाबतीत काही प्रमाणात असणारी सवलत विचारात घेऊन एन.पी.ए. निकषामुळे बँका व एन.बी.एफ.सी. यांचे या व्यवसायावरती येणाऱ्या मर्यादांचा पतसंस्थांनादेखील यापुढे छोट्या कर्जदारांसाठी सोने तारण कर्जाची वृद्धी करता येईल.

रुपये २.५० लाखाच्या वरील कर्ज घेणाऱ्या व्यक्तीबाबत त्याची परतफेड क्षमता असल्याची कागदोपत्री खात्री करण्यास देखील बँका व एन.बी.एफ.सी. यांना रिझर्व बँकेने सूचित केले आहे. त्यामुळे यापुढे बँका व एन.बी.एफ.सी. यांच्याकडे रुपये २.५० लाखांच्या वरील सोनेतारण कर्ज घेत असताना कर्जदाराला आपली परतफेड क्षमता कागदोपत्री सिद्ध करावी लागणार आहे. अशा प्रकारे आजपर्यंत अशी पूर्तता करण्याची बँका तसेच कर्जदार यांना सवयच नव्हती. आजवरच्या अनुभवातून हा बदल कर्जदार सकारात्मक पद्धतीने स्वीकारतील या बद्दल शक्यता कमी वाटते.

एका व्यक्तीची अनेक कर्ज खाती असल्यास त्याबाबत देखील रिझर्व बँक बारकाईने नियंत्रण ठेवणार असून रिझर्व्ह बँकेने या कर्ज व्यवहाराकडे अँटी-मनी लॉन्ड्रिंग (AML) दृष्टिकोनातून देखील पाहिले जाईल, असे स्पष्ट सूचित केल्याने यापुढे बँकांना देखील या संदर्भात खूप दक्षता घ्यावी लागेल. यापूर्वी बँका किंवा एन.बी.एफ.सी. यांच्याकडे अशा प्रकारे उघडली जाणारी खाती प्रतिबंधित होणार असल्याने आपोआपच हादेखील व्यवसाय पतसंस्था स्वतःकडे आकृष्ट करू शकतात. अर्थात एका व्यक्तीची अनेक कर्ज खाती उघडताना पतसंस्थांनादेखील अँटी-मनी लॉन्ड्रिंग (AML) होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

बँकांसाठी अग्रक्रम क्षेत्र कर्ज पुरवठा उद्दिष्ट पूर्तता ही अनिवार्य बाब असून, या कर्जाच्या अनुषंगाने अनेक बँका केवळ कर्ज अर्जावरती अग्रक्रम क्षेत्रात समाविष्ट होण्यासारखे कारण नमूद करून अशी कर्जे अग्रक्रम क्षेत्रात दाखवत असत. आता रिझर्व बँकेने या संदर्भात देखील ज्या कारणासाठी कर्ज घेतले जाणार आहे, त्या कारणाचा विनियोग झाल्याचा कागदोपत्री पुरावा दप्तरी घेण्यास बँकांना सांगितले आहे. या निर्बंधामुळे बँकांना सोने तारण कर्ज देताना आता कर्ज विनियोगाप्रमाणे कागदपत्रे ही घ्यावी लागतील.

सोनेतारण कर्ज घेणाऱ्या कर्जदाराची मानसिकता पाहता, हे कर्जदार बँकांना कितपत सहकार्य करतील, ही साशंकता आहे. पतसंस्थांना अग्रक्रम क्षेत्र कर्ज पुरवठा ही संकल्पना लागू नसल्याने हा सर्व कागदोपत्री सोपस्कार नको असणारा मोठा ग्राहकवर्ग पतसंस्थांकडे येऊ शकतो.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने व्यक्तिगत कर्ज मर्यादा ठरवताना ती रकमेवर न ठरवता सोन्याच्या वजनावरती ठरवलेली आहे. त्यामुळे विशेषतः

पुढील पानावर...

## विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्यूसर कंपनी महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

**अकोला –** येथील विदर्भ समृद्धी कृषी प्रोड्यूसर कंपनीने शेतकऱ्यांसाठी सातत्याने केलेल्या कामाबद्दल महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी नव्याने हळद प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येत असून त्याबाबतची माहिती यावेळी सांगण्यात आली.

तसेच हळद निर्यातीबाबतची माहिती सांगण्यात आली. कंपनीचे अध्यक्ष संतोष साखरे उपाध्यक्ष मोहन धोटे सचिव अमोल माडोकर आणि अन्य संचालक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कंपनीच्या सदस्यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

## अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचा लाभांश जाहीर

**पुणे –** येथील अण्णासाहेब मगर सहकारी बँकेच्या वतीने बँक सदस्यांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली.

बँक अध्यक्ष नंदकुमार लांडे, उपाध्यक्ष सीए अमेय दर्वे आणि आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रा. राजेश रास्ते यांनी आभार मानले. सभेला संचालक, अधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार : केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा



**नवी दिल्ली –** सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला अधिक बळकटी देण्याची आवश्यकता असून सहकार क्षेत्र हे ग्रामीण भारताच्या विकासाचा मापदंड आहे, असे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितले. नवी दिल्ली येथे सहकार मंत्रालयामध्ये आयोजित करण्यात आलेल्या मंथन बैठकीत ते अध्यक्ष पदावरून ते बोलत होते.

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, कृष्णपाल गुर्जर, सचिव डॉ. आशिष कुमार आणि विविध राज्यातील सहकार मंत्री, तज्ञ उपस्थित होते. सहकारी संस्थांनी अधिक प्रभावीपणाने आणि पारदर्शीपणे काम करून शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या हिताला प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आर्थिकदृष्ट्या अडचणीत असणार्या सहकारी बँकांना विविध घटकांना कर्जाची उपलब्धता करण्यासाठी निधीची गरज आहे. यासाठी केंद्र सरकारने यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केली आहे. ते म्हणाले की, राज्यातील ३१ सहकारी बँकापैकी २३ बँका सक्षमपणाने कार्यरत आहेत तर अन्य बँका अडचणीत आहेत. या बँकांना निधी उपलब्धा करून देण्याची गरज आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आर्थिक पुरवठा सुरळीत होण्यास हातभार लागणार आहे आणि आर्थिक सक्षमीकरण होणार आहे. तसेच राज्यातील २१ हजार प्राथमिक कृषी सहकारी संस्था डिजिटल सक्षमीकरणाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहेत. याबरोबर सहकार क्षेत्रातील अन्य घटकांच्या प्रगतीसाठी सक्षम करण्याचा प्रयत्न आहे असे त्यांनी नमूद केले.

मागील पानावरून...

# पतसंस्थांसाठी सोने तारण कर्जवृद्धीची सुवर्णसंधी

एनबीएफसी किंवा राष्ट्रीयीकृत बँकांच्या बाबतीत त्यांच्याकडे यापूर्वी या बाबतीत होणाऱ्या मोठ्या रकमांच्या व्यवहारावर मर्यादा येतील.

एकूण कर्ज व्यवहारात सोने तारण कर्ज व्यवहार किती असावा, याचेदेखील आता बँकांना प्रकटीकरण करावे लागणार आहे. अप्रत्यक्षरीत्या बँकांनी या व्यवसायात किती जोखीम घेतली आहे, हे समजणार आहे. पतसंस्थांच्या बाबतीत मात्र अशा प्रकारचे सध्या तरी बंधन नाही. पतसंस्थांच्या सध्या त्या त्या संस्थेच्या वैयक्तिक कर्ज महत्तम मर्यादेनुसार सोनेतारण कर्ज देण्यास मुभा असल्याने तसेच सोन्याच्या वजनावर महत्तम मर्यादा ठरणार नसल्याने विशेषतः मोठ्या आकाराच्या पतसंस्थांना याचा लाभ घेता येईल. एकूण कर्ज व्यवहारात सोनेतारण कर्ज व्यवहाराचे महत्तम प्रमाणाबाबत सध्या तरी पतसंस्थांना कोणतेही बंधन नाही.

कर्ज अदा करण्यापूर्वी कर्जदाराला योग्य ती माहिती देणे तसेच कर्ज मागणी अर्ज व कर्ज करारपत्रांमध्ये अनेक गोष्टींची पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने केला आहे.

याशिवाय कर्जदाराने तारण ठेवलेल्या सोन्याची सुरक्षितता जपण्याबाबतही बँकांवरती बंधन घातलेले असून कर्ज व्यवहार पूर्ण केल्यानंतर तारण सोने परत करण्याबाबतीत काल मर्यादा निर्धारित केली आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँका किंवा एन.बी.एफ.सी. यांना यापुढे सोने तारण कर्जाच्या बाबतीत त्यांच्याकडे तारण असणाऱ्या सोन्यावर फेर कर्ज किंवा री-प्लेज घेता येणार नाही, हे स्पष्ट केल्याने ज्या बँका किंवा विशेषतः एन.बी.एफ.सी. यापूर्वी अशा प्रकारचा व्यवहार करत असतील, त्यांना तरलतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. परिणामी त्यांना या कर्ज व्यवहारात रक्कम गुंतवण्यास मर्यादा येतील.

रिझर्व बँकेने कर्जदाराची सुरक्षितता व व्यवहारातील पारदर्शकता जपण्यासाठी अनेक सूचना दिलेल्या आहेत. यामध्ये अनेक बाबतीत कगदोपत्री औपचारिकता पूर्ण करणे हे बँका व एन.बी.एफ.सी. यांना जिकिरीचे होईल. यामध्ये ग्राहकवर्गदेखील किती सहकार्य करेल हा प्रश्न आहे. अशा स्थितीत हा ग्राहक वर्ग सावकारीकडे पुन्हा वळू नये, म्हणून पतसंस्थांना जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील.

पतसंस्थांनी देखील रिझर्व्ह बँकेच्या या परिपत्रकाचा बारकाईने अभ्यास करून ज्या ठिकाणी बँका किंवा एन.बी.एफ.सी. यांचेवर या कर्ज व्यवहारात त्यांना ज्या ज्या ठिकाणी मर्यादा येत असतील, अशा ठिकाणी पतसंस्थांना हा व्यवसाय वाढवण्यास नक्कीच सुवर्ण संधी आहे.

पतसंस्थांनी हा व्यवसाय वृद्धी करताना या व्यवहारातील सुरक्षितता व पारदर्शकता जपण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणेदेखील अत्यावश्यक आहे. अन्यथा व्यवसाय वृद्धीच्या प्रयत्नामध्ये जोखीम प्रमाण वाढेल.

पतसंस्थांनी या परिपत्रकाचा बारकाईने अभ्यास करून या व्यवसाय वृद्धीसाठी सहकार खाते/ नियामक मंडळ यांच्या सूचना विचारात घेऊन, या व्यवहारातील सुरक्षितता व पारदर्शकतेशी कोणतीही तडजोड न करता, कर्जदाराचे देखील सोयीचे दृष्टीने तारतम्याचा विचार करून स्वतःसाठी निकष व निर्बंध ठरवून हा जोखीम विरहित व्यवसाय वाढवण्यासाठी पतसंस्थांना ही नक्कीच एक सुवर्णसंधी आहे.

**– गणेश रा. निमकर, पुणे. मो. – ९८२२५ ६८५५०**

*****

# भारत सरकारच्या नवीन नॉमिनेशन कायद्यातील बदल

भारतीय संसदेने डिसेंबर२०२४ मध्ये मंजूर केलेले 'Nomination Law (Bill) Amendment' हे खरं तर बँकिंग कायदे (दुरुस्ती) विधेयक बील २०२४ (Banking Laws (Amendment) Bill 2024) आहे. हे विधेयक लोकसभेत ३ डिसेंबर २०२४ रोजी मंजूर करण्यात आले आहे. या विधेयकाचा मुख्य उद्देश भारतीय बँकिंग क्षेत्रात सुधारणा करणे, बँकेतील कामकाजाची कार्यक्षमता वाढवणे आणि ग्राहकांना अधिक सुविधा व संरक्षण देणे हा आहे. ज्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हे बदल प्रामुख्याने बँक खाती आणि इतर आर्थिक गुंतवणुकींशी संबंधित आहेत, ज्यायोगे खातेधारकांना त्यांच्या मालमत्तेच्या वारसा हक्काचे नियोजन अधिक सोपे आणि सुरक्षित करणे शक्य होणार आहे.




व्यंकटेश कुळकर्णी
९४०३० ८०७५१


- **काय आहेत हे प्रमुख बदल?**

- **एकाहून अधिक नॉमिनींची सोय –** नवीन नियमांनुसार, आता बँक खातेधारक त्यांच्या बँक खात्यात, मुदत ठेवी (FD), आवर्ती ठेवी (RD), आणि इतर आर्थिक गुंतवणुकींमध्ये चार व्यक्तींना नॉमिनी म्हणून नियुक्त करू शकतात. यापूर्वी फक्त एकाच व्यक्तीला नॉमिनी करण्याची मर्यादा होती. यामुळे खातेधारकांना त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मालमत्तेचे विभाजन सोयीस्करपणे करण्याची लवचिकता मिळेल.

- **टक्केवारी निश्चित करण्याची मुभा –**

सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे, खातेधारक आता नॉमिनी म्हणून नियुक्त केलेल्या प्रत्येक व्यक्तीला किती टक्के रक्कम मिळावी, हे स्पष्टपणे नमूद करू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला ४० टक्के तर दुसऱ्याला ३० टक्के आणि उरलेल्या दोघांना प्रत्येकी १५ टक्के रक्कम मिळेल असे ठरवता येईल. यामुळे भविष्यात वारसा हक्का वरून होणारे वाद टाळता येतील आणि मालमत्तेचे वाटप खातेधारकाच्या इच्छेनुसार होईल.

- **दावा न केलेल्या ठेवी कमी करण्याचे उद्दिष्ट –**

या बदलांमागे बँकिंग उद्योगात दावा न केलेल्या (Unclaimed) ठेवींचे प्रमाण कमी करणे हे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. अनेकदा नॉमिनी नसतांना किंवा योग्य माहिती नसल्यामुळे खातेधारकाच्या मृत्यूनंतर त्या खात्यातील रक्कम तशीच पडून राहते. नवीन नियमांमुळे ही समस्या कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

- **'महत्त्वपूर्ण-हित' (Substantial Interest) ची व्याख्या बदलली –**

बँकिंग कायद्यातील सुधारणांमध्ये महत्त्वपूर्ण हित या शब्दाची व्याख्या देखील बदलण्यात आली आहे. यापूर्वी, जर एखाद्या व्यक्तीची बँकेत ५ लाख रुपयांची गुंतवणूक असेल, तर त्याला 'महत्त्वपूर्ण हित' मानले जात असे. आता ही मर्यादा वाढवून २ कोटी करण्यात आली आहे. जवळपास ६० वर्षांपूर्वी निश्चित केलेली ही जुनी मर्यादा आताच्या आर्थिक परिस्थितीनुसार बदलण्यात आली आहे.

- **सेफ कस्टडी आणि सुरक्षा लॉकरसाठीही नॉमिनेशन –**

हे नवीन नियम केवळ बँक ठेव खात्यांपुरते मर्यादित नसून, सेफ कस्टडीमध्ये ठेवलेल्या वस्तू आणि सुरक्षा लॉकर (safety lockers) यांच्या नॉमिनेशनसाठीही लागू होतील. यामुळे लॉकरमधील मौल्यवान वस्तूंच्या वारसा हक्काची प्रक्रिया अधिक सोपी होणार आहे. यासोबतच सेबी (Securities and Exchange Board of India) ने शेअर बाजारातील गुंतवणूकदारांसाठी (demat account holder) आणि म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांसाठी देखील नॉमिनेशन नियमांमध्ये महत्त्वाचे बदल केले आहेत. हे बदल 'बँकिंग कायदे (दुरुस्ती) विधेयक २०२४' च्या सोबतच किंवा त्याच्या अनुषंगाने, गुंतवणूकदारांना अधिक सुविधा देण्यासाठी आणि वारसदार नसलेल्या (Unclaimed Assets) मालमत्तेचा प्रश्न सोडवण्यासाठी आणले गेले आहेत.

- **सेबीने लागू केलेले प्रमुख बदल खालीलप्रमाणे आहेत :–**
- **नॉमिनीची संख्या वाढवली –**

पूर्वी डिमॅट खात्यासाठी किंवा म्युच्युअल फंड फोलिओसाठी फक्त ३ नॉमिनी नियुक्त करता येत होते. आता नवीन नियमांनुसार, गुंतवणूकदार प्रत्येक डिमॅट खाते किंवा म्युच्युअल फंड फोलिओसाठी १० (दहा) नॉमिनी नियुक्त करू शकतात.

- **प्रत्येक नॉमिनीसाठी टक्केवारी निश्चित करण्याची सुविधा :–**

गुंतवणूकदार आता प्रत्येक नॉमिनीला किती टक्के मालमत्ता मिळेल, हे स्पष्टपणे नमूद करू शकतात. जर टक्केवारी नमूद केली नसेल, तर मालमत्ता सर्व नॉमिनींमध्ये समान वाटली जाईल.

- **नॉमिनीची ओळख आणि तपशील :–**

नॉमिनीच्या ओळखीसाठी पॅन (PAN), आधार (Aadhaar) क्रमांक किंवा पासपोर्ट क्रमांकासारखे महत्त्वाचे ओळखपत्र तपशील (personal identifiers) प्रदान करणे बंधनकारक केले आहे. यामुळे नॉमिनीची अचूक ओळख पटण्यास मदत होईल. त्यामुळे भविष्यातील फसवणूक कमी होईल. नॉमिनीचा फोटो आणि स्वाक्षरीदेखील आवश्यक असेल.

- **दोन प्रकारचे नॉमिनेशन पर्याय (बँकिंग प्रमाणे) :–**

**सिमल्टेनियस नॉमिनेशन** (Simultaneous Nomination) **:–** सर्व नियुक्त केलेले नॉमिनी एकाच वेळी खात्यातील रक्कम प्राप्त करण्यास पात्र असतील.

**सक्सेसिव्ह नॉमिनेशन** (Successive Nomination) **:–** नॉमिनींना प्राधान्य क्रमाने (पहिला, दुसरा, तिसरा) नियुक्त केले जाते. पहिला नॉमिनी उपलब्ध नसल्यास किंवा मरण पावल्यास, पुढच्या क्रमाने असलेल्या नॉमिनीला रक्कम मिळेल.

- **अक्षम** (Incapacitated) **गुंतवणूकदारांसाठी सुविधा :–**

जर गुंतवणूकदार शारीरिकदृष्ट्या अक्षम झाले, पण कायदेशीर करार करण्याची त्यांची क्षमता अजूनही असेल, तर त्यांनी नियुक्त केलेला (एक) नॉमिनी त्यांच्या वतीने खात्याचे व्यवहार करू शकतो. यासाठी काही सुरक्षा उपाय आणि पडताळणी प्रक्रिया असतील.

- **वारसा हस्तकला सुलभ करणे** (Transmission Process Simplification) :-

गुंतवणूकदाराच्या मृत्यूनंतर मालमत्ता नॉमिनीला हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुलभ केली आहे. नॉमिनींना आता मालमत्ता हस्तांतरित करण्यासाठी शपथपत्र (affidavits) किंवा नुकसानभरपाई बंधपत्र (Indemnity Bonds) यासारखी कागदपत्रे देण्याची गरज नाही.त्यांना फक्त मृत्यू प्रमाणपत्र आणि त्यांच्या स्वतःचे KYC तपशील द्यावे लागतील. संयुक्त खात्यांच्या बाबतीत, एका खाते धारकाचा मृत्यू झाल्यास, जिवंत असलेल्या सह-धारकांकडून (Surviving joint holders) KYC किंवा इतर कागदपत्रे मागितली जाणार नाहीत. फक्त मृत व्यक्तीचे मृत्यू प्रमाणपत्र पुरेसे असेल.

- **संयुक्त खातेधारकांसाठी नॉमिनेशन पर्यायी :–**

**पुढील पानावर...**

## जत विकास सहकारी अध्यक्षपदी विठ्ठल सावंत

**जत, जिल्हा सांगली** – येथील जत विकास सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी विठ्ठल सावंत आणि उपाध्यक्षपदी अण्णाप्पा माळी यांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संतोष बोगार यांनी काम पाहिले. दोनही पदाधिकाऱ्यांच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या आहेत.

## चौंडेश्वरी महिला सहकारी दूध उत्पादक संस्था अध्यक्षपदी भारती काळे

आष्टा – जिल्हा सांगली – येथील चौंडेश्वरी महिला सहकारी दुध उत्पादक संस्था अध्यक्षपदी भारती काळे आणि उपाध्यक्षपदी महानंदा शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एस. बी. पाटील यांनी काम पाहिले. संस्थेच्या संचालिका तसेच अधिकारी उपस्थित होते. सचिव विश्वजित पाटील यांनी आभार मानले.

# वर्धमानसारख्या सहकारी बँकांनी उद्योजकांना आर्थिक मदत द्यावी - मुख्यमंत्री

**नागपूर** – बँकेचे नाव 'वर्धमान' म्हणजेच 'वृद्धी' दर्शवणारे आहे आणि ती समृद्ध आहे. कारण यशस्वी, प्रतिष्ठित आणि या क्षेत्रात उत्कृष्टतेला गवसणी घालणाऱ्या व्यक्तींनी उभी केली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

येथे वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक रौप्य महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांनी बँकेच्या यशस्वी वाटचालीबाबत गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, वर्धमान अर्बन बँकेची स्थापना आणि नागपूर विधानसभा मतदारसंघातील आमदारकीचा प्रारंभ दोन्ही एकाच वर्षात झाले. बँकेचे नाव 'वर्धमान' म्हणजेच 'वृद्धी' दर्शवणारे आहे. आणि ती समृद्ध आहे कारण यशस्वी, प्रतिष्ठित आणि या क्षेत्रात उत्कृष्टतेला गवसणी घालणाऱ्या व्यक्तींनी उभी केली आहे. कोविड काळ वगळता, बँकेने सातत्याने १५ टक्के लाभांश वितरित केला आहे.

समाजाच्या प्रगतीसाठी आर्थिक संस्था या अत्यंत महत्त्वाच्या घटक आहेत. वर्धमानसारख्या सहकारी बँकांनी गरजू उद्योजकांना वेळेत आर्थिक मदत दिली आणि त्यांच्यामार्फत फक्त त्यांच्या व्यवसायांचा नव्हे, तर भारताच्या अर्थव्यवस्थेचाही विकास झाला. गेली २५ वर्षे बँक प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने आणि निष्ठेने बँकिंग मूल्यांचे संवर्धन करत आहे, हे कौतुकास्पद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय अर्थव्यवस्था झपाट्याने प्रगती करत आहे. वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेत वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेसारख्या संस्थांनीही दूरदर्शी आणि परिवर्तनशील विचारांची आवश्यकता ओळखली पाहिजे, असेही ते म्हणाले.

सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी खासदार अजय संचेती, माजी आमदार सागर मेघे, पगारिया समूहाचे अध्यक्ष उज्वल पगारिया, तसेच वर्धमान अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष अनिल पारख यांच्यासह अनेक पदाधिकारी संचालक अधिकारी उपस्थित होते.

मागील पानावरून...

# भारत सरकारच्या नवीन नॉमिनेशन कायद्यातील बदल

संयुक्त डिमॅट खाती किंवा म्युच्युअल फंड फोलिओसाठी नॉमिनेशन करणे पर्यायी (Optional) आहे. याचा अर्थ, संयुक्त खातेधारकाने नॉमिनेशन केले नाही तरी चालेल, कारण एका खातेदाराच्या मृत्यूनंतर मालमत्ता आपोआप जिवंत असलेल्या इतर खातेदारांकडे (Surviving holders) हस्तांतरित होते. (Rule of survivorship)

मात्र, जर सर्व संयुक्त खातेधारकांचा मृत्यू झाला, तर नॉमिनेशन महत्त्वाचे ठरते.

● **नॉमिनी हा विश्वस्त** (Trustee) **असतो, वारसदार** (Beneficiary) **नाही :-**

सेबीने पुन्हा स्पष्ट केले आहे की, नॉमिनी हा केवळ मृत गुंतवणूकदाराच्या कायदेशीर वारसदारांच्या वतीने 'विश्वस्त' म्हणून मालमत्ता धारण करतो. याचा अर्थ असा नाही की नॉमिनीला थेट वारसा हक्क मिळतो. कायदेशीर वारसदारांना (मृत व्यक्तीच्या इच्छेनुसार किंवा वारसा कायद्यानुसार) मालमत्ता मिळण्याचा अंतिम अधिकार असतो.

● **नियम लागू होण्याची अंतिम मुदत (महत्वाचे) :-**

या नवीन नियमांची अंमलबजावणी १ मार्च २०२५ पासून प्रभावी झाली आहे (काही तारखांमध्ये बदल झालेला असू शकतो, परंतु प्रमुख अंमलबजावणी याच सुमारास अपेक्षित आहे).

जुन्या गुंतवणूकदारांना ३० जून २४ पर्यंत नॉमिनेशनची निवड करण्याची किंवा नॉमिनेशन न करण्याची घोषणा (Opt-out) करण्याची मुदत दिली होती, त्यानंतर डिमॅट खाती/ फोलिओ डेबिटसाठी गोठवले जाण्याची शक्यता होती. या मुदतीमध्ये पुन्हा बदल करून ती आता वाढवण्यात आली आहे, जेणेकरून गुंतवणूकदारांना पुरेसा वेळ मिळावा.

या बदलांचा उद्देश शेअर बाजारातील गुंतवणूकदारांसाठी प्रक्रिया सुलभ करणे, अनक्लेम्ड मालमत्तेची समस्या कमी करणे आणि गुंतवणूकदारांना त्यांच्या मालमत्तेच्या हस्तांतरणासाठी अधिक लवचिकता व सुरक्षितता प्रदान करणे हा आहे. यामुळे गुंतवणूकदारांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला किंवा नॉमिनींना मालमत्ता मिळण्यास कमी अडचणी येतील.

● **बदलांचे महत्त्व :-**

या नवीन बदलांमुळे खातेधारकांना त्यांच्या आर्थिक मालमत्तेचे नियोजन अधिक सुलभपणे करता येणार आहे. हे बदल खालील प्रमुख बाबींमध्ये मदत करतील :-

● **पारदर्शकता** – मालमत्तेच्या वाटपाबाबत खातेधारकाची इच्छा स्पष्टपणे नमूद करता येईल, ज्यामुळे भविष्यातील कायदेशीर गुंतागुंत टाळता येईल.

● **सुरक्षितता** – नॉमिनेशनमुळे खातेधारकाच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेची सुरक्षितता सुनिश्चित होते आणि योग्य व्यक्तीला ती मिळते.

● **वाद कमी होतील** – अनेक वारसदार असताना मालमत्तेवरून होणारे वाद टाळण्यास मदत होईल, कारण प्रत्येक नॉमिनीला किती वाटा मिळेल हे आधीच ठरवलेले असेल.

● **सोपी प्रक्रिया** – वारसा हक्काची प्रक्रिया अधिक सोपी आणि जलद होईल, कारण वारस प्रमाणपत्र किंवा इतर कायदेशीर कागदपत्रांची आवश्यकता कमी होईल.

● **निष्कर्ष :-** भारत सरकारच्या नवीन नॉमिनेशन कायद्यातील बदल हे सामान्य नागरिकांच्या हिताचे आहेत. हे बदल आर्थिक नियोजनात अधिक सुस्पष्टता आणतात.

थोडक्यात, हा 'Nomination Law (Bill) Amendment' किंवा 'बँकिंग कायदे (दुरुस्ती) विधेयक २०२४' हा बँक खातेदारांसाठी नॉमिनेशन प्रक्रिया अधिक सोपी, लवचिक आणि सुरक्षित बनवणारा आहे. यामुळे खातेदारांना त्यांच्या बँक ठेवी आणि लॉकरमधील वस्तूंसाठी अधिक प्रभावीपणे वारसदार नियुक्त करता येतील, ज्यामुळे त्यांच्या मृत्यूनंतर निधी हस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ होईल आणि अनक्लेम्ड डिपॉझिट्सची (Unclaimed Deposits) समस्या कमी होण्यास मदत होईल.

**– व्यंकटेश कुलकर्णी, प्रशिक्षण केंद्र प्रमुख.**
**सहकार भारती सहकारी प्रशिक्षण संस्था कराड.**

*****

# पतसंस्था व बँकिंग क्षेत्रातील क्रांती : AI आणि ML चे युग

सहकारी पतसंस्था व बँकेत आजही आपण CBS प्रणालीमधील अडचणी दूर करण्याचा व ती अद्ययावत करण्याकरिता प्रयत्न करीत आहोत, असे असताना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि मशीन लर्निंग (ML) असे तंत्रज्ञान बँकिंग क्षेत्रात वेगाने शिरकाव करून ग्राहकांना आधुनिक बँकिंगकडे घेऊन जात आहे. ग्राहकांच्या बँकेकडून असलेल्या अपेक्षेपेक्षा अधिक सोपी थोडक्यात हायपर-पर्सनलाइज्ड बँकिंगचा अनुभव हे तंत्रज्ञान ग्राहकांना करून देत आहेत, सहकारात आपल्याला या तंत्रज्ञानाचा विचार एवढ्या लवकर करण्याची गरज आहे का? तर याचे उत्तर निश्चितच हो असे आहे. परंतु ते अधिक विस्तृतरीत्या समजावून घेण्याआधी आपण आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आणि मशीन लर्निंग (ML) नेमके काय आहे ते समजून घेऊयात.



**मंगेश देहडेकर**
**९९२१३०४८११**

AI म्हणजे यंत्रांना किंवा संगणकांना मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करण्याची क्षमता देणे, ज्यामुळे ती शिकू शकतील, समस्या सोडवू शकतील आणि निर्णय घेऊ शकतील. उदा. चेस खेळणारा संगणक किंवा ग्राहकांना उत्तर देणारा चॅटबॉट किंवा यांत्रिक call प्रणाली हे AI चे भाग आहेत. याउलट, ML हे AI चे एक उपक्षेत्र आहे, ज्यात यंत्रे डेटावरून शिकतात आणि स्वतःची कार्यक्षमता सुधारतात, जसे एखाद्या लहान मुलाला आपण विविध गोष्टी दाखवून किंवा सांगून प्रश्न विचारून शिकवतो. त्याचप्रमाणे यासाठी मशीनला प्रत्येक वेळी स्पष्टपणे प्रोग्राम करण्याची गरज नसते. आपण YouTube वर किंवा Netflix वर व्हिडिओ पाहताना आपल्याला आपण जे व्हिडिओ पाहतो, त्याच प्रकारचे इतर व्हिडिओ आपल्याला सुचवले जातात, ते ML मुळेच शक्य होते.

पतसंस्था किंवा बँकिंग संदर्भात आपण AI आणि ML विषयी चर्चा करू, AI आणि ML चा सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्राहक अनुभव सुधारणे. कल्पना करा, तुम्हाला रात्री दोन वाजता तुमच्या खात्याविषयी माहिती हवी आहे किंवा एखाद्या कर्जाबद्दल विचारायचे आहे. येथेच चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स मदतीला येतात. हे AI-आधारित रोबोट २४/७ उपलब्ध असतात, ग्राहकांच्या प्रश्नांची उत्तरे देतात, मूलभूत व्यवहार करतात आणि ग्राहकांना आवश्यक माहिती पुरवतात. यामुळे ग्राहकांचा वेळ वाचतो, त्याला त्याच्या वेळेनुसार बँकिंग सुविधा मिळतात आणि बँक किंवा पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होतो.

आज प्रत्येक ग्राहकाला आपल्या वेळेत व बँकेने योग्य अशी सेवा सुचविणे अपेक्षित असते. या तंत्रज्ञानामुळे वैयक्तिकृत सेवा देणेही शक्य होते. ML अल्गोरिदम्स तुमच्या व्यवहारांचा, बचतीच्या सवयींचा आणि गरजांचा अभ्यास करतात. या अभ्यासातून, तुम्हाला कोणत्या प्रकारच्या कर्जाची गरज आहे, कोणती गुंतवणूक योजना तुमच्यासाठी योग्य आहे किंवा कोणती विमा पॉलिसी तुमच्या कुटुंबासाठी फायदेशीर ठरू शकते, हे अचूकपणे सुचवले जाते. याचा परिणाम म्हणून, कर्ज प्रक्रिया अत्यंत वेगाने होते. ML अल्गोरिदम्स कर्ज अर्जदारांच्या मोठ्या डेटाचे विश्लेषण करून त्यांची क्रेडिट पात्रता काही मिनिटांत तपासू शकतात, ज्यामुळे कर्ज मंजुरीची प्रक्रिया खूप जलद होते आणि लोकांना वेळेवर निधी मिळू शकतो. शिवाय वेगाने प्रक्रिया करीत असताना चुकीचा कर्जदार संस्थेत प्रवेश करीत नाही आणि संस्था/बँकदेखील सुरक्षित राहते.

संस्थेमध्ये / बँकेमध्ये अनेक कामे अशी असतात जी वारंवार करावी लागतात, ज्याला आपण वर्क डुप्लिकेशन असे म्हणतो. यामध्ये कर्मचाऱ्यांचा अधिक वेळ जातो. ग्राहक सेवेबरोबरच, AI आणि ML वित्तीय संस्थांच्या कार्यक्षमतेत आणि सुरक्षिततेत लक्षणीय वाढ करतात. अनेक नियमित आणि पुनरावृत्तीची कामे, जसे की डेटा एंट्री, अहवाल तयार करणे, खात्यांची पडताळणी किंवा देयके तपासणे, AI मुळे स्वयंचलित करता येतात. यामुळे कर्मचाऱ्यांना अधिक महत्त्वाच्या आणि व्यवसायवाढीच्या, ग्राहकांबरोबरचे व्यावसायिक संबंध (PR) वाढविण्याच्या कामांवर लक्ष केंद्रित करता येते, जेणेकरून त्यांची क्षमता अधिक चांगल्या प्रकारे वापरली जाते. PR हा बँकिंग व्यवस्थेत अतिशय महत्त्वाचा भाग मानला जातो. आज आपण सर्व सुविधा असतानादेखील सरकारी बँकांबद्दल ग्राहकाचे मत फारसे चांगले नाही असेच पाहतो. याचे कारण म्हणजे तेथील कर्मचारी त्यांच्या दैनंदिन ऑपरेशनल कामातच एवढे अडकून पडतात की, प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिक सेवा पुरवणे त्यांना शक्य होत नाही. परिणामी आज खासगी बँका या सरकारी बँकांपेक्षा अधिक प्रभावी ठरत आहेत.

बँकिंग हे प्रमुख आर्थिक क्षेत्र असल्याने यामध्ये ग्राहक व बँक या दोघांचीही फसवणूक होण्याची शक्यता असते. आज ज्या प्रमाणात लोक बँकिंग व्यवहार करत आहेत व सातत्याने या व्यवहारांची संख्या वाढत आहे, त्यानुसार व्यवहार करण्याकरिताच मनुष्यबळ अपुरे पडताना दिसते. मग त्या व्यवहारातील फसवणूक ओळखणे, हे अतिशय कठीण कार्य झाले आहे. परंतु AI चा बँकिंगमधील वापर पाहिल्यास फसवणूक ओळखणे (Fraud Detection) हे AI आणि MLचे एक महत्त्वाचे कार्य आहे. हे तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहारांच्या डेटाचे विश्लेषण करते आणि संशयास्पद किंवा अनपेक्षित नमुने शोधते. उदाहरणार्थ, तुमच्या खात्यावरून अचानक परदेशात मोठा व्यवहार झाल्यास, अचानक नियमित होणाऱ्या रकमेच्या व्यवहारापेक्षा कमी किंवा अधिक रकमेचे व्यवहार होणे, एखाद्या विशिष्ट बँक खात्यात अचानक अनेक छोट्या छोट्या किंवा एकच मोठी रक्कम ट्रान्सफर होणे, अनेक निरनिराळ्या देशातून, राज्यातून, वेगवेगळ्या व्यक्तींमार्फत खात्यावर पैसे जमा होणे, अनेक दिवसांपासून ज्या खात्यावर व्यवहार नाहीत, अशा खात्यांवर अचानक मोठ्या प्रमाणात व्यवहार सुरू होणे. AI ते लगेच ओळखू शकते आणि तुम्हाला सतर्क करू शकते. यामुळे बँकांना आणि पतसंस्थांना संभाव्य आर्थिक नुकसानीपासून वाचण्यास खूप मदत होते.

बँकिंग मधील AIच्या वाढत्या वापरामुळे येत्या काही वर्षांतच ग्राहक सेवेच्या व्याख्याच बदलून जातील. पुढील काही वर्षात AI आणि ML वित्तीय क्षेत्रात आणखी खोलवर रुजतील. आपण हायपर पर्सनलायझेशनच्या दिशेने वाटचाल करत आहोत. जिथे प्रत्येक ग्राहकासाठी अत्यंत वैयक्तीकृत आणि भावनिक स्तरावर जोडलेली सेवा दिली जाईल. ग्राहकांची आर्थिक उद्दिष्टे आणि सवयी यानुसार ग्राहकांना प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन मिळेल. Predictive Analytics ज्याला आपण भविष्यवेधी विश्लेषण असे म्हणू शकतो. ते वाढेल, म्हणजे AI भविष्यातील आर्थिक अडचणी किंवा बाजारातील चढ-उतार यांचा अंदाज अधिक अचूकपणे घेईल, ज्यामुळे संस्थांना वेळेवर उपाययोजना करता येतील आणि मोठे नुकसान टाळता येईल. याव्यतिरिक्त, AI सायबर सुरक्षांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. सायबर हल्ल्यांपासून संरक्षण करण्यासाठी आणि डेटाची गोपनीयता व सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी ते एक अभेद्य कवच म्हणून काम करेल.

ग्राहक सेवा व सुरक्षा यांच्या इतकेच व्यवसाय वाढ हा भागदेखील अत्यंत महत्त्वाचा आहे. कोणत्या प्रॉडक्टकरिता कोणत्या ग्राहकाला आपण संपर्क केला पाहिजे, हे आपल्याला सहज सुचवू शकेल. उदाहरणार्थ ज्येष्ठ

**पुढील पानावर...**

# शिवशक्ती सहकारी पतसंस्थेच्या स्थलांतरीत कार्यालयाचे उद्घाटन

**सातारा –** शिवशक्ती सहकारी पतसंस्था समाजातील सर्वसामान्य जनतेसाठी महत्त्वपूर्ण भूमिका यशस्वीपणाने पार पाडीत आहे, म्हणजे एका दृष्टीने ग्रामीण जीवनाचा आर्थिक कणा आहे, असे मत कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांनी व्यक्त केले आहे. पतसंस्थेच्या स्थलांतरित कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर साबळे, उपाध्यक्ष मधुकर नलावडे, संचालक, अधिकारी, कर्मचारी, खातेदार, हितचिंतक यावेळी उपस्थित होते. आमदार शिंदे म्हणाले, पतसंस्थेची आर्थिक स्थिति आगामी काळात अधिक भक्कम करण्यासाठी भक्कमपणाने सर्वांनी प्रयत्न करावेत. सध्या संस्थेच्या ठेवी ११० कोटी असून त्या ५०० कोटींपर्यंत वाढाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्ष साबळे यांनी पतसंस्थेच्या वाटचालीबाबत माहिती सांगितली. संचालक साबळे यांनी आभार मानले.

# शेतकरी केंद्रस्थानी ठेवून बाजार समित्यांनी सुविधा द्याव्या – जिल्हा उपनिबंधक सुद्रीक

**सातारा –** शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बाजार समित्या असून शेतकरी केंद्रस्थानी ठेवून बाजार समित्यांनी सुविधा पुराव्यात, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक संजय सुद्रीक यांनी केले.



राज्य कृषि पणन मंडळ, पुणे व राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दहा बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक, समित्यांचे सचिव यांच्यासाठी पणन विषयक एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक संजय सुद्रीक यांचे हस्ते करण्यात आले. पणनचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, सहाय्यक निबंधक संजय जाधव, डीएमआय अच्युत सुरवसे, कृषि अधिकारी सिद्धेश्वर मोकळे, जिल्ह्यातील सर्व बाजार समितीचे पदाधिकारी, सचिव उपस्थित होते.

बाजार समित्यांसाठी शेतकरी हा महत्वाचा घटक असल्याचे सांगून जिल्हा उपनिबंधक सुद्रीक म्हणाले, आजच्या बदलत्या काळात बाजार समितीने पायाभूत सुविधा अधिक बळकट करणे गरजेचे असून जिल्ह्यातील बाजार समित्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी काम करावे.

कृषि पणन मंडळाचे कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी कार्यशाळेची प्रस्तावना करून पणन मंडळाच्या विविध योजनांबाबत माहिती सांगितली. जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना उपयुक्त ठरतील अशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालास जास्तीत जास्त भाव मिळण्यासाठी कामकाज करावे, असे डॉ. घुले यांनी सांगितले.

सहायक निबंधक संजय जाधव यांनी पणन विभागाचे विविध कायदे व निधीचा वापर कसा करावा, याबाबत मार्गदर्शन केले. कृषी अधिकारी सिध्देश्वर मोकळे यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती सांगितली. केंद्र सरकारच्या डीएमआयचे अधिकारी अच्युत सुरवसे यांनी डीएमआयच्या बाजार समिती व शेतकरी यांचेसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती सांगितली. अमोल भोंग यांनी आभार मानले.

## पतसंस्था व बँकिंग क्षेत्रातील क्रांती : AI आणि ML चे युग

नागरिकांकरिता एखादी योजना असेल व त्याकरिता आपण वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यास ती जाहिरात सर्वच वयोगटातील व्यक्ती वाचतील. म्हणजेच ज्यांच्यासाठी ती योजना नाही किंवा जे त्या योजनेसाठी पात्र नाहीत. अशांपर्यंत ती योजना जास्त प्रमाणात जाईल व ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अपेक्षित योजना पोहोचेलच असे नाही. याव्यतिरिक्त किती ज्येष्ठ नागरिकांपर्यंत आपली योजना पोहोचली आहे, याचा कोणताही डेटा आपल्याकडे नसेल. म्हणजेच जाहिरातीवर होणारा आपला खर्च व त्यामागील आपले उद्दिष्ट पूर्ण होईलच याची शाश्वती नसते. परंतु व्यवसाय वाढीमध्ये AI चा वापर केल्यास अपेक्षित ग्राहकांपर्यंत कमी खर्चात पोहोचता येईल.

अर्थात, AI आणि ML स्वीकारताना काही आव्हाने आहेत. डेटाची गोपनीयता आणि त्याचा गैरवापर टाळणे हे महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाचा खर्च सुरुवातीला जास्त असू शकतो आणि कर्मचाऱ्यांचे या नवीन तंत्रज्ञानासाठी प्रशिक्षण करणे आवश्यक आहे. मात्र, योग्य नियोजन आणि टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी केल्यास, पतसंस्था आणि बँका या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करू शकतात.

थोडक्यात, AI आणि ML हे केवळ तांत्रिक बदल नाहीत, तर ते वित्तीय संस्थांसाठी एक नवीन युगाची सुरुवात आहेत. यामुळे केवळ संस्थांच्या कार्यक्षमतेत सुधारणा होणार नाही, तर ग्राहकांशी असलेले संबंध अधिक दृढ होतील आणि त्यांना अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि वैयक्तिकृत वित्तीय सेवा मिळतील. त्यामुळे, AI आणि ML हे पतसंस्था आणि बँकांच्या भविष्यातील यशासाठी महत्त्वाचे घटक बनतील यात शंका नाही.

**– मंगेश देहेडकर. मोबाइल नं. – ९९२१३ ०४८११**

Co-op trainer consultant ❋❋❋



# विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेने ओलांडला १०० कोटी ठेवींचा टप्पा




**नागपूर –** येथील विवेकानंद नागरी सहकारी प्रत्यय संस्थेची आढावा व नियोजन बैठक झाली. बैठकीमध्ये सर्व संचालक अधिकारी व कर्मचारी यांनी मागील आर्थिक वर्षातील प्रगतीचा आढावा घेत भविष्यातील कामाचे नियोजन केले.

संस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे यांनी सांगितले की, विवेकानंद सोसायटीच्या स्थापनेपासूनच संस्थेने वेगळेपण जपले आहे. यंदाच्या सन २४-२५ आर्थिक वर्षात संस्थेने दमदार प्रगती केली असून संस्थेच्या ठेवी, कर्ज व नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. आर्थिक वर्षात १०० कोटींच्या ठेवींचा टप्पा गाठत एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

संस्थेला यंदा ३ कोटींच्या वर ढोबळ नफा प्राप्त झाला आहे. सन २५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेचा एकूण व्यवसाय १८० कोटींच्या वर नेण्याचा संकल्प करण्यात आला.

संचालक सुधीर दसरी, कल्याण दिवाण, मधु गौर, विवेक बापट, श्रीकांत आगलावे, विवेक धाक्रस, डॉ. राधिका मुरकुटे, डॉ. माधुरी इंदूरकर दीपक बारड, राहुल वेलंकीवार, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद गोंधळेकर यांसह संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मागील आर्थिक वर्षात संस्थेच्या प्रगतीसाठी विशेष योगदान देणारे संस्थेचे कर्मचारी सतीश धापोडकर, ब्रजेश जोशी, मीनल दंदे यांना सन्मानित करण्यात आले.

# डिजिटल व्यवहारासाठी जळगाव जनता सहकारी बँकेचे साक्षरता अभियान

**जळगाव –** डिजिटल व्यवहार अधिक प्रभावीपणे व्हावेत, यासाठी बँकेच्या माध्यमातून ग्राहकांसाठी साक्षरता अभियान राबविले जाणार आहे. बँकेच्या सुवर्ण महोत्सवापर्यंत पाच हजार कोटींच्या व्यवसायाचे उद्दिष्ट आणि शाखांचा विस्तार केला जाईल, असे जळगाव जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने यांनी सांगितले.

बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. बँकेचे संचालक, सभासद उपस्थित होते. सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. बँकेने सन २०२४-२५ या काळात तीन हजार ६०० कोटींचा एकत्रित व्यवसाय करून २३४ कोटींची भरीव वाढ केली आहे. बँकेस करपूर्व नफा २५.८८ कोटी झाला असून, निव्वळ नफा १७.०८ कोटी इतका झाला आहे. निव्वळ एनपीए शून्य टक्के राखण्यात बँकेस यश आले आहे. बँकेचे भागधारक, ४३ शाखा व ग्राहक आणि डॉ. भरत अमळकर यांच्या नेतृत्वात केशवस्मृती समूहाचा मोठा परिवार आहे.

सामाजिक बांधिलकी जोपासताना बँक आर्थिक प्रगतीकडेही वाटचाल करीत आहे. राज्यात सक्षम व सुरक्षित बँक म्हणून जळगाव जनता सहकारी बँकेने नावलौकिक प्राप्त केला आहे. बँकेच्या सुरुवातीस अविनाश आचार्य, संचालक मंडळ व सभासदांच्या अथक प्रयत्नांतून बँकेचा वटवृक्ष झाला. बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या मेहनतीने बँक भक्कम, अंतर्गत व्यवस्थापन सक्षम करण्याच्या प्रयत्नातून डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून वाटचाल गतीने होण्यास मदत झाली, असे ते म्हणाले.

डिजिटल व्यवहार अधिक प्रभावीपणे व्हावेत, यासाठी बँक साक्षरता अभियान राबवणार आहे. शाखांचा विस्तार लवकर करण्याचा प्रयत्न आहे. लहान लोकांची ही मोठी बँक आहे, अशा शब्दात बँकेचे अध्यक्ष मदाने यांनी बँकेची ध्येयधोरणे आणि भविष्यातील संकल्पना सभासदांपुढे मांडल्या. 'वंदे मातरम्' गीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. वरुण नेवे यांनी हे गीत सादर केले. अहवाल वर्षातील दिवंगत महनीय व्यक्ती व सभासदांच्या श्रद्धांजलीची नामावली वाचन बँकेच्या संचालिका आरती हुजूरबाजार यांनी केले. त्यानंतर संचालक नितीन झंवर यांनी बँकेची वाटचाल आणि आर्थिक प्रगतीचा आढावा घेतला विषय पत्रिकेवरील विषयाचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती यांनी केले. उपाध्यक्ष डॉ. अतुल सरोदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन संचालिका संध्या देशमुख यांनी केले.

# संस्कार सहकारी पतसंस्थेच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्ताने वृक्षारोपण




**गडचिरोली –** येथील संस्कार सहकारी पतसंस्थेच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्ताने वतीने कुरखेडा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्याचप्रमाणे नगर पंचायत कार्यालय आणि उपजिल्हा रुग्णालयातील स्वच्छता कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या विविध योजनांची माहिती सांगण्यात आली. संस्था संस्थापक अध्यक्ष मनीष फाये, तसेच अन्य पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. धिरज बांगरे यांनी प्रास्ताविक तर लोकेश हटवार यांनी आभार मानले. दिवाकर देवांगण यांनी सूत्रसंचालन केले.

पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त अनेकविध उपक्रम राबविण्यात येत असून संचालकांसह संस्थेच्या ग्राहक आणि खातेदारांनी देखील याविषयी आनंद व्यक्त केला आणि संस्थेच्या आगामी वाटचालीसाठी प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये बेरोजगाराची समस्या कमी करण्याची क्षमता : राष्ट्रीय बँक परिषदेत व्यापक चर्चा

**पुणे** – देशातील बेरोजगाराची समस्या कमी करण्याची क्षमता सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगामध्ये असून सर्वाधिक रोजगार निर्माण करणारे क्षेत्र म्हणून या क्षेत्राकडे पाहण्यात येईल, असे मत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक आणि बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

सहकार भारती, अर्थ संवाद आणि ग्लोबल इंडियन ओरिजिन नेटवर्क यांच्या संयुक्त विद्यमाने बँकिंग अँन्ड एमएसएमई सेक्टर कनक्लेव्ह या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर जेष्ठ उद्योजक राम भोगले, विश्वेश कुलकर्णी, इंद्रनील चितळे, प्रवीण बढेकर आणि सहकार भारती पुणे महानगर अध्यक्ष दिनेश गांधी उपस्थित होते.



देशामध्ये युवकांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे, असे नमूद करून ते म्हणाले, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा आहे. यामुळे देशाच्या अर्थ व्यवस्थेला अधिक गती मिळणार आहे. बांधकाम उद्योगास कर्ज देण्यासाठी सहकारी बँका तयार असतात. मात्र आरबीआयने प्राधान्यक्रम क्षेत्रात बांधकाम क्षेत्राचा विचार करण्यात आला नाही, पण बँकाच्या सुरक्षिततेसाठी बांधकाम क्षेत्राला कर्ज पुरवठा हा सुरक्षित आहे, पण आरबीआयच्या भूमिकेमुळे ते शक्य होत नाही.



**✲ उद्योग व्यवसाय हा बंधन मुक्त करण्याची गरज –**

देशातील उद्योग व्यवसाय हा बंधन मुक्त करण्याची गरज जेष्ठ उद्योगपती अभय फिरोदिया यांनी बोलताना व्यक्त केली. ते म्हणाले, देशातील शेतकरी वर्ग हा अन्नदाता आहे, तसा मतदाता आहे. त्यांना आवश्यक त्या सर्व सुविधा देण्याची आवश्यकता आहे. तसेच देशातील उद्योग व्यवसाय क्षेत्र बंधन मुक्त करण्याची तितकीच आवश्यकता आहे, तरच व्यवसाय विकसित होण्यास हातभार लागणार आहे. एखादा नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक असते. मात्र याबाबत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग संघटनेने केंद्र आणि राज्य शासनाकडे मागण्यांबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. तसेच या क्षेत्राबाबतच्या धोरणात आवश्यक ते बदल करण्यासाठी पाठपुरावा करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

परिषदेच्या आयोजनामागची भूमिका सहकार भारती पुणे महानगर अध्यक्ष गांधी यांनी मांडली. डॉ. केतन जोगळेकर यांनी प्रास्ताविक आणि ममता क्षेमकल्याणी यांनी आभार मानले.

## विश्वेश्वर सहकारी बँकेचा सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर

**पुणे** – विश्वेश्वर सहकारी बँकेने आगामी आर्थिक वर्षासाठी सदस्यांना १० टक्के लाभांश देण्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर केले आहे. बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. बँकेला शेड्यूल्ड दर्जा मिळाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

बँक अध्यक्ष अनिल गाढवे, उपाध्यक्ष राजेंद्र मिरजे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम आपटे तसेच संचालक अधिकारी ग्राहक उपस्थित होते. बँकिंग तज्ञ आणि राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी बँकेला दर्जा मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.

अध्यक्ष गाढवे यांनी बँकेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. तसेच माजी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला.

शाहीर श्रीकांत रेणके यांनी पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. उपाध्यक्ष मिरजे यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाच्या अध्यक्षपदी अंकुश काकडे



**पुणे** – महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाच्या अध्यक्षपदी सहकार क्षेत्रातील जेष्ठ सहकारी कार्यकर्ते अंकुश काकडे यांची निवड करण्यात आली आहे.

सहायक निबंधक प्रगती वाबळे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली. संस्थेच्या नूतन संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये नूतन अध्यक्षांची निवड एकमताने करण्यात आली. काकडे हे माजी महापौर असून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष आहेत.

काकडे यांच्या निवडीबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## योगिराज सहकारी पतसंस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**पुणे** – दहावीच्या परीक्षेत ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान योगिराज सहकारी पतसंस्थेच्या वतीने माजी महापौर दत्तात्रय गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर, श्रीराम समर्थ सहकारी पतसंस्था संचालक सुधाकर धनकुडे, शाखाध्यक्ष राजेंद्र मुरकुटे, आदी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम करण्यात येतो. तसेच २५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. आजवर १६५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. बारावीच्या परीक्षेत ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाचा खर्च संस्थेच्या वतीने करण्यात येणार आहे, असे तापकीर यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गंगणे यांनी आभार मानले.

# सहकारी संस्थांची वार्षिक सभा - नियम, परंपरा आणि घटना

सहकारी संस्थांच्या वार्षिक सभांमध्ये कुठले विषय असावेत, यासंबंधांतील तरतुदींचे काटेकोर पालन आजकाल होताना दिसत नाही. सहकार क्षेत्रातील बँकांच्या अन्य संस्थांच्या वार्षिक सभांच्या सूचना वर्तमानपत्रांत येत असतात. त्यावर सहज नजर टाकली तरी काही वेळा हे सहज लक्षात येते.

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांना राज्याचा सहकार कायदा लागू होतो. काही सहकारी बँका, पतपेढ्या इत्यादी बहुराज्यीय असल्याने त्यांना राज्याचा कायदा लागू न होता, फक्त केंद्राचाच बहुराज्यीय सहकार कायदा लागू होतो. या दोन्ही कायद्यांमध्ये व त्या त्या संस्थांच्या उपविधींमध्ये (बायलॉज) वार्षिक सर्वसाधारण सभांबाबत बऱ्याच तरतूदी असतात. पण त्या सर्वच्या सर्व तरतुदींचे काटेकोर पालन होतेच असे नाही. राज्याचे केंद्राचे सहकार खातेही याबाबत खूप आग्रही दिसत नाही. त्यामुळे अनेकदा समान कायद्याखाली चालणाऱ्या सहकारी संस्थांच्या विषयपत्रिकांमध्ये सुद्धा भिन्नता आढळतात. सहकारी बँकांच्या बाबतीत, रिझर्व्ह बँक आणि नाबार्डसारखे नियामकसुद्धा सहकार कायद्यांतील तरतुदींच्या काटेकोर पालनाबद्दल आग्रही दिसत नाहीत. त्यामुळे काही संस्थांमध्ये, वार्षिक सभा या जणू सभासद मेळावे वाटाव्यात, अशाही प्रकारे होताना दिसतात.




सीए उदय कर्वे
९८१९८६६२०१


'नेमेची येतो मग पावसाळा' उक्तीप्रमाणे, जून ते सप्टेंबरमध्ये लाखो हजारो सभासद असलेल्या सहकारी बँका आणि पतपेढ्यांपासून ते अगदी दहा बारा सभासदांच्या हाऊसिंग सोसायट्यांपर्यंत, सगळ्यांच्या वार्षिक सभांचा काळ असतो. देशात सहकार क्षेत्रात महाराष्ट्र राज्य अग्रणी आहे. अशा सभांना उपस्थित राहणाऱ्यांची संख्या, एकट्या महाराष्ट्रातच, काही लाखांमध्ये आहे.

**(१) प्रत्येक वार्षिक सभेत, मागील वार्षिक सभेच्या इतिवृत्तास मंजुरी घ्यावी लागते का?**

– राज्याच्या सहकार कायद्यात वार्षिक सभांबद्दल जी विषयपत्रिका दिली आहे. (कलम ७५ खालील नियम ६० अनुसार, नमुना एक्स) त्यामध्ये कुठेही हा विषय समाविष्ट केलेला नाही. बहुराज्यीय सहकार कायद्याखालील विषय पत्रिकेतही (कलम ३९) तसा उल्लेख नाही. संस्थेच्या पोटनियमांत तसा उल्लेख असेल तर मात्र ते करणे आवश्यक आहे. एका सहकारी बँकेत दरवर्षी सभेच्या सुरुवातीला याच विषयावर अर्धा-पाऊण तास बरीचशी निरर्थक, पण वादळी चर्चा होऊन, शेवटी ते इतिवृत्त मंजूरच होत असे. वेळ वाया जातो.



**(२) वार्षिक सभा सुट्टीच्या दिवशीच घेतली पाहिजे असे आहे का ?**

– अशीही तरतूद दोनही कायद्यांत नाही. संस्थेच्या पोटनियमांत तसे असेल तर मात्र ते जरुरीचे असते. तसेच जास्तीत जास्त सभासदांना आणि नोकरी, व्यवसाय करणाऱ्या तरुण सभासदांना सहभागी होता यावे, याही दृष्टीने रविवार, सुट्टीचे दिवस उपयुक्त ठरतात.

**(३) वार्षिक सभा प्रस्तावित लाभांशाचा दर कमीजास्त करू शकते का ?**

– राज्य कायद्यानुसार, संचालक मंडळाने प्रस्तावित केलेला लाभांशाचा दर वाढवण्याचा अधिकार वार्षिक सभेला नसतो. (नियम ५२) तो दर कमी करण्याचा अधिकार मात्र सभेला असतो. बहुराज्यीय कायद्यात नेमकी अशीच तरतूद नाही. त्यात म्हटले आहे कि लाभांशाचा दर हा विहित मर्यादेहून जास्त नसावा (कलम ६३). यासंबंधीची तरतूद अनेकदा संस्थांच्या उपविधिंमध्येसुद्धा असते.

**(४) वार्षिक सभेत सगळेच ठराव साध्या बहुमताने मंजूर होऊ शकतात का ?**

– हे पूर्णतः खरे नसून, याला काही अपवाद आहेत. उदाहरणार्थ, एखाद्या सभासदाचे निलंबन करायचे असेल तर उपस्थित सभासदांच्या किमान तीन चतुर्थांश बहुमत लागते. (राज्य कायदा कलम ३५) बहुराज्यीय कायदा कलम ३० प्रमाणे यासाठी किमान दोन तृतीयांश बहुमत लागते. तसेच पोटनियम दुरुस्तीसाठी उपस्थितीच्या किमान दोन तृतीयांश बहुमत लागते. (राज्य नियम १२) बहुराज्य कायदा कलम ११ प्रमाणेही ते किमान दोन तृतीयांश असावे लागते.

**(५) वार्षिक सभेतील मंजूर ठरावांना त्यानंतर कोणाचीही मंजुरी लागत नाही का ?**

– यालाही काही अपवाद आहेत. उदाहरणार्थ, वार्षिक सभेने मंजूर केलेल्या पोटनियम दुरुस्त्यांना सहकार आयुक्तांची मंजुरी लागते (राज्य कायदा कलम १३ आणि नियम १२, बहुराज्य कायदा कलम ११). सहकारी बँकांच्या बाबतीत यासाठी रिझर्व्ह बँकेचीही मान्यता लागते. रिझर्व्ह बँकेनी बंधने घातली आहेत. अशा सहकारी बँकांच्या वार्षिक सभेने लाभांश मंजूर केला, तरी तो प्रत्यक्षात देण्यासाठी रिझर्व्ह बँकेची परवानगी लागते. वार्षिक सभेने मंजूर केलेली सभासदांच्या निलंबनाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सहकार आयुक्तांची मंजुरी लागते. (राज्य कायदा कलम ३५), बहुराज्य कायद्यात मात्र याबाबत अशी तरतूद दिसत नाही. महाराष्ट्रातील ज्या सहकारी संस्था ऑडिट वर्गवारी अ किंवा ब मध्ये येत नाहीत, त्यांच्या बाबतीत वार्षिक सभेने मंजूर केलेल्या कर्ज निर्लेखनासाठी सहकार आयुक्तांची मंजुरी लागते (राज्य नियम ४९). याही बाबतीत बहुराज्य कायद्यात अशी तरतूद नाही.

**(६) 'अध्यक्षांच्या परवानगीने, आयत्या वेळचे/अन्य विषय' या विषयात कुठलेही विषय मंजूर करता येतात का ?**

– यालाही अपवाद आहेत. उदाहरणार्थ, सभासदाचे निलंबन कार्यकारी मंडळातून पदाधिकाऱ्याचे निलंबन, उपविधी दुरुस्ती आणि कर्ज निर्लेखन असे विषय सभेच्या विषयपत्रिकेवर असतील, तरच सभेत घेता येतात. (राज्य नियम ६० व ४९). बहुराज्य कायद्यामध्ये 'आयत्या वेळचे विषय' असा विषयच नमूद केलेला नाही. (कलम ३९). पण संस्थांच्या उपविधींमध्ये याबाबत उल्लेख असू शकतो.

**(७) सहकारी बँका/पतपेढ्या इत्यादींनी उपस्थितांना भेटवस्तू देणे आवश्यक आहे का ?**

– काही सभासद जणू याचसाठी येतात अशी दुर्दैवी परिस्थिती, काही संस्थांमध्ये सध्या दिसत असली तरी, कायद्यात अशी तरतूद नाही आणि संस्थेच्या उपविधिंमध्ये पण ती सहसा नसतेच.

**(८) सभेत सहभागी न होता, फक्त भेटवस्तू घेऊन उपस्थिती नोंदवता येते का ?**

– याचे उत्तर खरे तर नकारार्थी असावयास हवे. पण हल्ली काही

**पुढील पानावर...**

## राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच जाहीर होणार

**नवी दिल्ली** – नजीकच्या काळात राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर करण्यात येणार आहे आणि त्याची अंमल बजावणी २०२५ ते २०४५ या कालावधीसाठी असणार आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी सांगितली. येथे झालेल्या मंथन बैठकीत त्यांनी वरील माहिती सांगितली.

ते म्हणाले, या धोरणांतर्गत प्रत्येक राज्याचे सहकार धोरण त्या त्या राज्याच्या परिस्थितीनुसार तयार करण्यात येणार आहे. बैठकीत सहकार क्षेत्रातल्या विविध उद्दिष्टांच्या पूर्ततेचा आढावा घेण्यात आला. तसेच जगातील सर्वात मोठे गोदाम सहकाराच्या माध्यमातून उभारण्याबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

## खामगाव अर्बन बँकेच्या उद्योग शाखेचे सुसज्ज वास्तूमध्ये नूतनीकरण

बुलढाणा – येथील खामगाव अर्बन बँकेच्या उद्योग शाखेचे सुसज्ज वास्तूमध्ये प्रदीर्घ कालावधीनंतर नूतनीकरण अकोला जिल्हा पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. बँक अध्यक्ष प्रा. विजय पुंडे, उद्योजक कन्हेयालाल पारिख, संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. अध्यक्ष पुंडे यांनी मनोगत व्यक्त केले आणि आगामी काळात शाखा विस्तार आणि सामाजिक बांधिलकी भावनेतून करण्यात येणारे उपक्रम याबाबत माहिती सांगितली.

उद्योग शाखेच्या पालक संचालिका मनीषा माटे, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव, उद्योजक अरुण गुप्ता, आदी उपस्थित होते. राजू जुनारे यांनी आभार मानले.

## राजाराम बापू सहकारी बँकेचा १२ टक्के लाभांश जाहीर

सांगली – पारदर्शी कामकाज आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यामुळे राजाराम बापू सहकारी बँक देशामध्ये २० व्या क्रमांकावर पोचली आहे, असे माजी मंत्री आणि आमदार जयंत पाटील यांनी सांगितले. बँकेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यावेळी ही माहिती सांगण्यात आली. या सभेत सदस्यांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

देशाच्या विविध भागात १५०० सहकारी बँका कार्यरत आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, सहकारी संस्था या एका व्यक्तीच्या अथवा राजकीय पक्षाच्या नाही तर त्या सर्व सामान्य जनतेच्या मालकीच्या असतात. त्याच्या विश्वासार्हतेला प्राधान्य देत असतात आणि आजवर याच भूमिकेतून संस्थांचे कामकाज सुरू आहे. आरबीआयचे निर्बंध वाढूनही संस्था चांगल्या प्रकारे कार्यरत आहे. यासाठी अनेकांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

व्यासपीठावर बँक अध्यक्ष विजय यादव, राज्य साखर कारखाना महासंघ अध्यक्ष पी. आर. पाटील, राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतीक पाटील, आदी उपस्थित होते. अध्यक्ष यादव यांनी बँकेच्या वाटचालीची माहिती सांगितली. प्रा. शामराव पाटील यांनी प्रास्ताविकात माहिती सांगितली. व्यवस्थापकीय संचालक प्रदीप बाबर यांनी कार्यक्रम पत्रिकेचे वाचन केले. उपाध्यक्ष माणिक पाटील यांनी आभार मानले.

सभेमध्ये विविध विषयांवर उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना संबंधित अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

मागील पानावरून...

## सहकारी संस्थांची वार्षिक सभा - नियम, परंपरा आणि घटना

संस्थांमध्ये, सभास्थानी प्रवेश नोंदणी करतानाच, सभेच्या सुरुवात होण्यापूर्वी, उपस्थितीचे प्रमाणपत्र देतात व भेट वस्तुही वितरित करतात. एका सहकारी पतसंस्थेत सभा सुरु करण्याच्या वेळी त्या संस्थेच्या उपविधींप्रमाणे आवश्यक असलेली किमान शंभर सभासदांची उपस्थिती सभागृहात नसल्याने, सभा तासाभरासाठी तहकूब केली जात होती. त्याच वेळी दोनशेहून अधिक सभासद भेटवस्तू ताब्यात घेऊन बाहेरच्या बाहेर निघूनही गेले होते. अशा घटना खूपच खेदजनक वाटतात.

**(९) पुढील वर्षांसाठीचे अंदाजपत्रक/ योजना सभेत मांडणे आवश्यक नसते का ?**

– राज्य कायद्याप्रमाणे पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रक सभेपुढे मांडणे आवश्यक आहे. (नमुना एक्स, विषय क्रमांक ९). बहुराज्यीय कायद्याच्या कलम ३९ प्रमाणे तर, वार्षिक सभेत पुढील वर्षासाठीच्या वार्षिक अंदाजपत्रकाबरोबर, पुढील वर्षासाठीची कार्ययोजना आणि दीर्घकालीन दृष्टिकोन योजना, मंजूर होणे आवश्यक आहे.

**(१०) वार्षिक सभेला कुठलाही विषय नामंजूर करण्याचा अधिकार असतो का ?**

– हे काहीसे खरे असले तरी काही विषय मंजूर करणे हे क्रमप्राप्तच असते. जसे की, नफा वितरण करताना ज्या रकमा सहकार कायद्यानुसार किंवा रिझर्व्ह बँकेसारख्या नियामकांच्या निर्देशांनुसार, विशिष्ट निधिंकडे वर्ग कराव्या लागतात, त्यासाठी मंजूरी द्यावीच लागते. उदा:- नफ्याच्या २५ टक्के रक्कम राखीव निधिकडे वर्ग करणे इत्यादी.

**(११) वार्षिक सभेत सहभागी होण्यासाठी एखादा वैयक्तिक सभासद, दुसऱ्याच एखाद्या त्रयस्थ व्यक्तीची (प्रॉक्सीप्रमाणे) नेमणूक करू शकतो का ?**

– सहकार कायद्यांत अशी कुठलीही तरतूद नाही. संस्थेचे शेअर्स संयुक्त नावाने घेतलेले असतील आणि शेअर सर्टिफिकेटवर ज्याचे नाव प्रथम/आधी लिहिलेले आहे, तो सभासद सभेला हजर राहू शकत नसेल, तर ज्याचे नाव त्याच्यानंतर लिहिलेले आहे तो संयुक्त सभासद वार्षिक सभेत सहभागी होऊ शकतो आणि सभेत मतदानही करू शकतो. (राज्य सहकार कायदा कलम २७, बहुराज्य सहकार कायदा कलम ३२).

**(१२) वार्षिक सभेत कोणीही सभासद सहभागी होऊ शकतो का ?**

– या संदर्भात सभासद याचा अर्थ भागधारक (शेअर होल्डर) असा आहे. त्यामुळे, साहजिकच नाममात्र सभासद (नॉमिनल मेंबर) इत्यादी या सभांमध्ये सहभागी होऊ शकत नाहीत. महाराष्ट्र सहकार कायद्यात अशी पण एक तरतूद आहे की, नव्याने सभासद झालेले वैयक्तिक सभासद, हे सभासदत्त्व मिळाल्यापासून पहिली दोन वर्षे संस्थेच्या कामकाजात मतदान करू शकत नाहीत. हाऊसिंग, प्रिमायसेस सोसायटींना मात्र हे लागू होत नाही. (कलम २७). केंद्रीय कायद्यात नवीन सभासदांसाठी अशा स्वरूपाची तरतूद आढळत नाही.

वार्षिक सभा या सर्व नियमांचे पालन करत झाल्या, तर त्या कायदेशीरदृष्ट्या परिपूर्ण होतील. अधिकाधिक माहितीपूर्ण व अभ्यासपूर्ण व्हाव्यात आणि त्यांना सभासद मेळाव्यांचे स्वरूप येऊ नये.

**– उदय म. कर्वे, मोबाईल नं.– ९८१९८ ६६२०१**

**(लेखक सी. ए. उदय कर्वे सहकार क्षेत्राशी दीर्घकाळ निगडित असून सहकार कायद्यांचे अभ्यासक आहेत.)**

***

# बँकिंग क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा - कासाचा वसा

भारतातील बँकिंग क्षेत्रात कासा या संकल्पनेचे अनन्य साधारण महत्त्व आहे. बँकांच्या ठेवींपैकी चालू खात्यातील ठेवी आणि बचत खात्यातील ठेवी यांच्या इंग्रजी शब्दातील अद्याक्षरे यावरून कासा संकल्पनेची निर्मिती झाली आहे. कासा ठेवीमध्ये चालू खात्यातील ठेवी आणि बचत खात्यातील ठेवी यांचा एकत्रितपणे विचार करण्यात येतो. नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत पिग्मी खात्यातील कमी व्याजदराच्या ठेवीदेखील कासा या संकल्पनेमध्ये समाविष्ट होतात.

**⁂ कासाचे महत्त्व –**

भारतातील संपूर्ण बँकिंग उद्योगांमध्ये कासा ठेवींना फार मोठे महत्त्व आहे. बँका ठेवी गोळा करतात, त्यापैकी सर्वात कमी व्याजदर असलेल्या ठेवी असतात. बचत खात्यावर सध्या तीन ते चार टक्के एवढे व्याज दिले जाते. काही बँका तीन टक्क्यांपेक्षा कमी ही व्याज देतात, तर चालू ठेव खात्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जात नाही.



**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५

चालू ठेव खात्यातील बँकांना मिळणाऱ्या ठेवी या बँकांसाठी अत्यंत कमी खर्चाच्या असतात. नागरी सहकारी बँका पिग्मी बचत ठेवी स्वीकारतात. यांचा व्याजदर तीन टक्क्यांच्या आसपास असतो. कमी व्याजदरामध्ये कासाच्या स्वरूपात बँकांना प्रचंड प्रमाणात ठेवी प्राप्त होत असतात. बँकांचा मुख्य व्यवसाय ठेवी स्वीकारून कर्ज देणे हा आहे. या व्यवसायाच्या दृष्टीने बँकांना कमी खर्चाच्या ठेवी मिळाल्यास कर्जाचे व्याजदर कमी ठेवता येऊ शकतात. कर्जावर मिळणारे व्याज आणि ठेवींवर दिलेले व्याज यातील तफावत म्हणजे बँकांचा नफा असतो. लाभक्षमतेच्या दृष्टीने कासा ठेवींचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. बँकांचे एकूण ठेवींमध्ये कासाचे प्रमाण जेवढे जास्त असेल, त्या प्रमाणात बँकेची लाभक्षमता वाढत असते. भारतातील बँकिंग व्यवसायातील काही राष्ट्रीयीकृत बँका आणि काही खाजगी बँका यांचे कासाचे प्रमाण ४० टक्केच्या पुढे आहे.

कासाच्या ठेवींमुळे या बँकांची लाभक्षमता अन्य बँकांच्या तुलनेत खूप जास्त आहे.

**⁂ कासा ठेवींबद्दल अन्य माहिती –**

भारतामधील पारंपरिक बँकिंगमध्ये सर्वसामान्य मध्यम वर्गाच्या बचत ठेवी बँकांमध्ये असतात. मागील अनेक वर्षापासून बँकिंगचे हे वैशिष्ट्य आहे. पगारदारांची खाती, शेतकऱ्यांची खाती, लहान व्यावसायिकांची खाती, विद्यार्थी वर्गाची खाती इत्यादी प्रकारच्या बचत खात्यांमार्फत बँकांना मोठ्या प्रमाणात ठेवी मिळत असतात. खातेदारांना बँका चेक पुस्तके, डेबिट, क्रेडिट कार्डस्, क्लिअरिंगच्या, सेवा देत असतात. डिजिटल पेमेंटच्या काळात बचत खात्यातून सहजपणे खरेदी करता येऊ शकेल अशी व्यवस्था बँका करून देतात. या सोयींमुळे बचत खाती खातेदारांसाठी आणि बँकांसाठीही अत्यंत फायद्याची असतात. बचत ठेव खात्यांमधून कर्ज खात्याचे हप्ते भरण्याची सुविधा, दरमहा बचत करण्यासाठी स्टँडिंग इन्स्ट्रक्शनची सुविधा खातेदारांना बँकांमार्फत दिली जाते.

मध्यमवर्गीय, अल्प उत्पन्न गट, म. न. रे. गा. मजूर आणि सरकारी अनुदानांचा फायदा मिळवणारे या सर्वांची बचत खाती बँकांमधून असतात आणि बँकांना कमी खर्चात यातून मोठ्या ठेवी प्राप्त होतात. करंट खाती किंवा चालू ठेव खाती, ही प्रामुख्याने व्यापारी वर्ग कंपन्या, संस्था, प्रतिष्ठाने यांची असतात. व्यावसायिक व्यवहारांसाठी बँका करंट खाते उघडण्याचा आग्रह धरतात. या खात्यावर बँका व्याज देत नसल्या तरी या खात्यावर कितीही प्रमाणावर व्यवहार करण्याची मुभा असते. दररोज कितीही वेळा पैसे ठेवता, काढता येतात. कितीही चेक्स देता येतात. क्लिअरिंगसाठी कितीही चेक्स जमा करता येतात. या सुविधांमुळे व्यापारी वर्गाच्या दृष्टीने ही अत्यंत सोयीची खाती असतात. ज्या कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर देणी द्यायची असतात. त्यांच्या दृष्टीने ही खाती अत्यंत सोयीची असतात. अलीकडच्या काळात सर्व बँकांनी खात्यांवरील ऑनलाइन व्यवहार करण्याची परवानगी खातेदारांना दिलेली असल्यामुळे ते अधिक सोयीचे झाले आहे.

या खात्यातूनही कर्जाचे हप्ते, बचतीसाठी स्टँडिंग इन्स्ट्रक्शन्स देता येतात.

ऑनलाइन पेमेंटची व्यवस्था या खात्यांमध्ये सर्व बँकांनी देऊ केलेली आहे.

या खात्यांमार्फत निधीचे हस्तांतरण, आरटीजीएस किंवा एनईएफटीच्या माध्यमातून खातेदारांच्या गरजेनुसार करता येते. कोअर बँकिंग प्रणालीमुळे कोणत्याही शाखेतून मर्यादित स्वरूपात व्यवहार करण्याची सुविधा खातेदारांना दिली जाते. नागरी सहकारी बँकातून पिग्मी खाती उघडण्यात येतात. यामध्ये बँकेचा प्रतिनिधी खातेदारांच्याकडे जाऊन दररोज रक्कम गोळा करतो आणि ती बँकेत जमा करतो. ही खाती बहुतांशी सहा महिने ते एक वर्ष या काळासाठी असतात याचा व्याजदर अतिशय कमी असतो.

बँकेचा प्रतिनिधी जाऊन पैसे गोळा करत असल्यामुळे खातेदारांच्या दृष्टीने हे अत्यंत सोयीचे असते. छोट्या खातेदारांसाठी पिग्मी ठेव ही सर्वात सोयीची असते. पिग्मी ठेवींचा समावेश कासामध्ये होतो.

**⁂ कासा ठेवी वाढवण्याचे उपाय –**

कासा ठेवी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज असते. सध्या सर्व बँकांमध्ये, सर्व सुविधा उपलब्ध असल्यामुळे काउंटरवरील ग्राहक सेवेचे अनन्यसाधारण महत्त्व असते.

ज्या बँकेत काउंटरवर झटपट आणि सस्मित सेवा मिळेल, अशा ठिकाणी जाण्याचा खातेदारांचा कल असतो. सोयीच्या वेळा, व्यापारी वर्गासाठी रोकड उपलब्धता, हेही महत्त्वाचे मुद्दे ठरतात. शाखेच्या परिसरातील सर्व बचत आणि व्यावसायिक खाती आपल्याकडे असावीत, अशा पद्धतीने प्रयत्न करता येऊ शकतो. परिसरातील संस्था, कंपन्या, शाळा, महाविद्यालय, शासकीय, निमशासकीय कार्यालय येथे संपर्क असला पाहिजे. शासकीय खाते उघडण्याबाबत अटी असल्या तरी तेथील कर्मचारी, अधिकारी वर्गाची खाती निश्चितपणे उघडता येऊ शकतात. कासा प्रकारच्या ठेवी वाढवण्यासाठी मार्केटिंगच्या प्रयत्नांची नितांत गरज असते आणि सातत्याने हे करावे लागते.

मार्केटिंग करताना अन्य बँकांमधील सोयी सवलती याबद्दल माहिती असली पाहिजे. आपल्या बँकेच्या कोणत्या सोयी सवलती अन्य बँकांच्या तुलनेत चांगल्या आहेत, याबद्दल ठामपणे सांगता आले पाहिजे. काउंटरवरील कर्मचारी, अधिकारी कामाचे दरम्यान क्रॉस सेलिंग करून कासा ठेवी वाढवू शकतात. कुटुंबातल्या प्रत्येकाची खाती आपल्या बँकेत असावी, मुलांची खाती असावीत आणि परिचित आणि नातेवाईकांचीही खाती आपल्याच बँकेत असावीत, यासाठी प्रयत्न करता येईल.

ग्राहक सेवा चांगली असल्यास मौखिक प्रसिद्धीद्वारे ग्राहक वर्ग वाढतो. ज्येष्ठ नागरिकांना विशेष सेवा देणे, त्यांच्याशी आपुलकीने बोलणे, त्यांना

**पुढील पानावर...**

## कोल्हापूर अर्बन बँकेच्या सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर

**कोल्हापूर –** कोल्हापूर अर्बन बँकेच्या सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. लाभांशाची रक्कम सदस्यांच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असून राखीव निधी १८३.९० कोटी असून ठेवी ८५७.१७ कोटीच्या आहेत तर एकूण कर्ज ४७२.७९ कोटी असून निव्वळ नफा ६.६८ कोटी झाला आहे. निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०.५७ टक्के इतके आहे.

## भारती मध्य. सहकारी ग्राहक भांडार संस्थेच्या अध्यक्षपदी विजयमाला कदम

**पुणे –** भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार संस्थेच्या अध्यक्षपदी एकमताने विजयमाला कदम यांची निवड करण्यात आली आहे. नूतन संचालकांची नुकतीच बैठक झाली त्यामध्ये वरील निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी भागवत पवार यांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहनिबंधक निलम पिंगळे यांनी काम पाहिले.

मागील पानावरून...

## बँकिंग क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा – कासाचा वसा

एकाच जागी सर्व व्यवहार करण्याची सुविधा देणे, यातून ज्येष्ठ नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात ठेवी मिळवता येतात. अशिक्षित, अपंग, ग्रामीण भागातील नागरिक यांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यामार्फत ही नवा व्यवसाय सहजपणे मिळतो.

कासासाठी मार्केटिंग करणे, ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून शाखाधिकारी ते सेवक वर्गापर्यंत प्रत्येकाने त्यात सहभागी होणे अत्यंत आवश्यक आहे.

अलीकडच्या काळात शाखांना उद्दिष्ट देत असताना कासाचे विशेष उद्दिष्ट दिले जाते.

हे उद्दिष्ट पूर्ण करण्याची जबाबदारी शाखेतील प्रत्येकाची असते आणि प्रत्येकाने त्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न करणे गरजेचे असते. आपले परिचित, आपले नातेवाईक आपल्याच बँकेतून आर्थिक सेवा घेतील, यासाठी विशेष प्रयत्न केला पाहिजे.

देशातील काही बँकांच्या कासाची टक्केवारी पुढील तक्त्यात दिली आहे. बँकेच्या एकूण ठेवींमध्ये कासाचे प्रमाण ४० टक्के पेक्षा अधिक असल्यास बँकेची लाभक्षमता उत्तम असते, असा सर्वसामान्य नियम आहे. त्यादृष्टीने बँकांनी आणि त्यांच्या प्रत्येक शाखेने कसोशीने प्रयत्न करण्याची गरज आहे.

| बँकेचे नाव | कासा ठेवी |
|---|---|
| स्टेट बँक – ३९.९७ | महा बँक – ५३.२९ |
| सेंट्रल बँक.– ५०.०२ | पंजाब नॅशनल. – ३७.९५ |
| आयसीआयसीआय. – ४२.१८ | एचडीएफसी – ३८.७२ |
| ॲक्सिस बँक – ४१.० | आयडीएफसी – ४६.०९ |
| ठाणे जनता सह. – २९.५६ | देवगिरी नागरी – ३१.६७ |
| खामगाव अर्बन – ४२.८२ | प्रियदर्शनी, जालना – ६५.२९ |

लेखामधील आकडेवारी बँकांच्या वेबसाईटवरून घेतली आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

*****


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

✻ **प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

# विश्वेश्वर बँकेला शेड्यूल्ड दर्जा मिळाल्याने आधुनिकतेची वाटचाल गतिमान

विश्वेश्वर सहकारी बँक ही पुण्यातील सहकारी क्षेत्रातील एक नामांकित बँक आहे. दि. ०९ मे २०२५ रोजी बँकेला शेड्यूल्ड दर्जा प्राप्त झाल्याचे भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध झाले. बँकेचे संस्थापक कै. भरतशेठ गाडवे, कै. नामदेवराव रुकारी व कै. बाबूराव हरपळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी १९७२ साली लावलेल्या रोपट्याचा आता मोठा वटवृक्ष होवून, त्याला ही समाधानाची फळे आलेले बघून सर्वजण भारावून गेले. बँकेने सन १९७२ पासून ५३ वर्षे अखंडपणे प्रामाणिक व पारदर्शी कामकाज केले आहे. खातेदार/सभासद यांच्या हिताला डोळ्यासमोर ठेवूनच आज पर्यंतचा बँकेचा प्रवास झाला आहे.

विश्वेश्वर बँकेची स्थापना ७ नोव्हेंबर १९७२ ला दिवाळी पाडव्याच्या शुभमुहुर्तावर झाली. उद्योगपती पद्मश्री डॉ. निलकंठ कल्याणी यांनी बँकेची मुहूर्तमेढ रोवली. बँकेने सन १९७६-७७ च्या आर्थिक वर्षात सभासदांना पहिला लाभांश दिला. ती परंपरा अखंडितपणे आजपर्यंत चालू आहे. यावरुनच बँकेच्या आर्थिक स्थिती किती मजबूत आहे हे समजून येईल. विश्वेश्वर बँक ही रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांनी वेळोवेळी जारी केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करत आहे. किंबहुना बँकेचे सर्व संचालकांचा याबाबत आग्रह आणि कटाक्ष कायम राहिला आहे. बँकेने ग्राहकांना गेल्या ५३ वर्षामध्ये काळानुरुप सुयोग्य सेवा देण्यासाठी कार्यपद्धतीमध्ये सतत बदल केले आहेत. बँकेचा व्यवसाय लहान असतानासुद्धा सन २००६-०७ या वर्षामध्ये विद्यमान अध्यक्ष अनिल गाडवे यांच्या नेतृत्वाखाली कोअर बँकींग प्रकल्प यशस्वी करुन दाखविला. त्यानंतर बँकेने RTGS /Mobile Banking, ATM इ. सेवा पुरविल्या आहेत. लवकरच बँक इंटरनेट बँकींगद्वारे व्यवहार करण्याची सुविधा देणार आहे. सन २०११ साली बँकेने कर्नाटक राज्यातील एक बँक आपल्या बँकेत विलीन करुन, मल्टीस्टेट दर्जा प्राप्त केला. आधी मल्टीस्टेट आणि आता शेड्यूल्ड दर्जा मिळणारी ही भारतातील एकमेव बँक असावी. सर्वसाधारणपणे बँकेस शेड्यूल्ड दर्जा आधी प्राप्त होतो व त्यानंतर बँका मल्टीस्टेट होण्याचा प्रयत्न करतात. बँकेचे ज्येष्ठ संचालक सुनिलशेठ रुकारी बँकेचे १९८७ पासून संचालक असून, त्यांच्या करारी व प्रशासकीय कौशल्यामुळे बँकेने उत्तमता साध्य केली आहे. तसेच बँकेचे विद्यमान अध्यक्ष अनिल गाडवे यांचा प्रचंड लोक संपर्क आणि माणूस ओळखण्याची हातोटी यामुळे सध्या बँकेस NPA चे प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यात यश मिळाले आहे. याशिवाय बँकेचे संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांचे बँकेच्या वाढीसाठी सतत प्रयत्न असतात. विश्वेश्वर बँकेचे संचालक मंडळामध्ये प्रामुख्याने सर्व व्यापारी मंडळी संचालक असल्यामुळे, व्यवसाय कसा करावयाचा, याचे बाळकडू बँकेस मिळाले असल्यामुळे बँकेने विशेषतः सन २०११ पासून आजपर्यंत व्यवसायिक वाढ ही प्रतिवर्षी सरासरी १० ते १५% केली आहे. मागील दशकामध्ये खरं तर सहकारी बँकांपुढे आस्तित्त्वाची लढाई होती. तसेच भविष्यामध्ये यामध्ये अनेक आव्हाने आहेत. रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार बँकेने व्यवस्थापन मंडळ (BOM) स्थापन करुन, त्यामध्ये बँकींग तज्ञ यांना घेतल्याने, मार्गदर्शन मिळत आहे. RBI ने सन २००४ पासून सहकारी बँकेस शाखा विस्तार, अन्य परवानगी यावरती प्रतिबंध आणला होता. परंतु मागील दोन वर्षांपासून जेव्हा केंद्र सरकारने सहकार मंत्रालय स्थापन करुन खऱ्या अर्थाने सहकाराला संजीवनी दिली असे म्हटले, तर वावगे ठरणार नाही. यामुळे RBI कडे सहकारी बँकांच्या अडचणींचे निराकरण होण्यासाठी निश्चित हातभार लागला. विश्वेश्वर बँक ही आज पुण्यामधील दोन मोठ्या बँका कॉसमॉस बँक व जनता सहकारी बँक, पुणे बरोबरील मल्टीस्टेट शेड्यूल्ड बँक झाली आहे. सध्या बँकेच्या एकूण ३० शाखा कार्यरत असून, एकूण व्यवसाय अंदाजे ३,८०० कोटींचा आहे. बँकेचा CRAR १६% च्या जवळपास असून, सेवक संख्या ३९६ आहे.

*** शेड्यूल्ड दर्जा मिळाला म्हणजे काय झाले ?**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विश्वेश्वर बँकेस शेड्यूल्ड दर्जा दिला असून, आता ही बँक मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक म्हणून कामकाज करणार आहे. भारतामध्ये एकूण ४९ Scheduled बँका आहेत. यामध्ये RBI चा Financially Sound and Well Managed (FSWM) निकष पूर्ण करणाऱ्या अंदाजे ३५-४० बँका आहेत. शेड्यूल्ड बँक झाल्यामुळे येथून पुढे बँकेस व्यवसायाच्या अन्य सहकारी बँकांपेक्षा जास्त संधी मिळणार आहेत. उदा. विदेश विनिमय व्यवसाय, बँक हमी पत्र अदा करु शकेल, बिल्डर्सची RERA खाती उघडता येतील, बँक अन्य बँका, सरकारी संस्था, ट्रस्ट इ. च्या ठेवी स्विकारु शकेल, Internet सुविधा, अशा सेवा देण्यासाठी कोणतीही अडचण भविष्यात राहणार नाही. यामुळे बँकेच्या व्यवसायाची गरुड भरारी मारण्यास बँक सक्षम (सज्ज) होईल.

पुण्यातील नागरी सहकारी बँकेस हा शेड्यूल्ड दर्जा १९८८ नंतर, म्हणजे तब्बल ३७ वर्षांनंतर मिळाला आहे. चांगली सेवा देवून व्यवसाय वाढ करणे हे नक्कीच आव्हान आहे. भविष्यात बँक Professional संचालक मंडळ तसेच सुशिक्षित सेवक वर्ग याच्या आधारे उत्तम नाव कमवून सहकारातील एक आदर्श बँक असेल, असा विश्वास वाटतो. समर्पित सभासद, संचालक, सेवक वर्ग यांच्या अविरत कष्टाचे हे फलित आहे. बँकेस नुकताच शेड्युल्ड दर्जा प्राप्त झाल्यामुळे यापुढे बँकेस आधुनिक बँकींगची कवाडे खुली झाली आहेत.

**- डॉ. चिंतामणी वैजापूरकर, तज्ञ संचालक**
**विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे**
**मो. क्र. ९९२२४ ४६५६३**
vchintamani62gmail.com

*****

# ऊस शेतीमध्ये 'एआय'च्या वापरासाठी कर्जाची उपलब्धता होणार



**पुणे** - ऊसाच्या शेतीसाठी एआयचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात यावा, यासाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज पुरवठा करण्याच्या धोरणात आवश्यक ते बदल करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे सरव्यवस्थापक संजय शितोळे यांनी सांगितले.

बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. ऊस शेती आणि कृषी क्षेत्रात एआयचा वापर हा कार्यशाळेचा विषय होता. ते म्हणाले जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उस शेतीमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर अधिकाधिक प्रमाणात करावा, याबाबत शासन आग्रही आहे.

यासाठी बँकेने एकात्मिक प्रकल्प योजना राबवून त्या माध्यमातून कर्ज पुरवठा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. यावेळी बँकेचे संचालक, अधिकारी आणि ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# बँकिंग व्यतिरीक्त वित्तीय कंपनी

बँकेबरोबर 'बँकिंग व्यतिरिक्त वित्तीय कंपनी बँकिंग सुविधा देऊ लागल्या आहेत. विविध कंपन्या आपली सरप्लस रक्कम कर्जरूपाने देऊन त्यावर व्याज आकारणी करते. त्यांना फायदा होतो. तसेच ज्यांना गरज आहे, त्यांना मदत देऊ केली जाते. नाहीतरी तो अधिकच पैसा बाजूला ठेवलेला असतो. त्याचा वापर सत्कर्मी होतो इतकेच. 'कर्ज देऊ शकता' अशी मंजुरी भारतीय रिझर्व्ह बँकेकडून अशा कंपन्यांना घ्यावी लागते. एखादी कंपनी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. ती कंपनी मर्यादित कंपनी किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असावी. आणि कंपनीचा किमान निव्वळ मालकीचा निधी रु. २ कोटी असणे आवश्यक आहे. काही अटींची पूर्तता करावी लागते.




एनबीएफसीकडून काही गरजा पूर्तीसाठी कर्ज मिळू शकते. उदा. वैयक्तिक, वाहन, गृहकर्ज, सोने कर्ज होय. अशा कंपनी कर्ज देऊ शकतात तरीदेखील त्या बँकेशी बरोबरी करू शकत नाहीत. बँक सरकारची अधिकृत घटक आहे. बँकेद्वारे बँकिंगच्या सर्व प्रकारच्या सेवा समाजाला मिळतात. परंतु एनबीएससीला कर्ज देण्याची संमती असली तरी त्यांच्याकडे बँकिंगचे लायसन्स नाही. हाच मुख्य फरक बँक व एनबीएफसीमध्ये आहे. तरीदेखील त्या बँकिंगच्या काही सेवा समजाला देतात. त्यांची नाविन्यपूर्ण कर्जप्रणाली आहे. भारतात पूर्वीपासून कर्ज देणे घेणे फेडणे होत आलेले आहे. तरीदेखील म्हणावा तितका समाजाचा स्तर उंचावलेला नाही. याला काही इतर गोष्टीही जबाबदार असतील असे वाटते. कर्ज घेऊन त्याचा विनियोग कसा केला जातो याला अतीव महत्त्व असते. End use of fund म्हणजे बँकेकडून कर्जरुपी मिळालेल्या रकमेचा विनियोग ज्यासाठी कर्ज घेतले त्याचसाठी ती रक्कम वापरली जाईलच, असे अजिबात नसते. तसाच पैसा वापरणे अतिशय महत्त्वाचे असते. अन्यथा तो गुन्हा होतो. मनस्ताप होतो.

येणारे संकट असे सांगून का येते? एकदम दारावर जोरजोरात थापा मारू लागते. आजारपण, मुलांचे अचानक खर्च, आपलेच कुठेतरी जाणे, त्याला आधीपासून तरतूद थोडीच केलेली असते. कुठेतरी अधिक फंड असतो, Surplus fund पैसे पडलेले असतात, ते कर्जरूपाने इतरांना देणे, एनबीएफसी यांनी सुरू केली. हे एक क्रांतिकारक पाऊल होय. भारतीय रिझर्व्ह बँकेने त्यास मंजुरी दिली आहे. परवानगीच्या आधारावर एनबीएफसी यांची ठराविक लिंक ओपन करून माहितीनुसार पुढे पुढे जाऊन शेवटी कर्ज घेण्यापाशी थांबा येतो.

अशी आरबीआयची मंजुरी मिळालेली बरीच ॲप्स आहेत. त्यापैकी योग्य निवड करताना मार्गदर्शक होतील, अशी ॲप्सची नावे पुढे नमूद केलेली आहेत. प्रत्यक्ष ॲप्स डाउनलोड करून, साईट ओपन करून बारकाईने माहिती घेऊन नंतर कर्ज प्रकरण करावे. या पद्धतीने वेगवेगळ्या प्रकारची कर्ज प्रकरणे मंजूर होतात. इथे वैयक्तिक कर्ज (पर्सनल लोन) प्रकरणे खूप मोठ्या प्रमाणात केलेली आहेत. नव्याने येत असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. इतकेच इथे सांगता येईल. वापरून वेळ निघून जाते. नाहीतर आपले कर्ज काढून काम होते. म्हणा कदाचित त्याचसाठी पटापट करा अर्ज, भरा माहिती, द्या उत्तरे आणि घ्या कर्ज. अशी झटपट पद्धतीची नव्याने कर्ज मंजुरी आणि पाठोपाठ कर्ज वितरण करणारी टेक्नॉलॉजी तरुणाईमध्ये याचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणात होत आहे. टेक्नोलॉजीला तरुणाईकडून विशेष प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे एनबीएफसी कर्ज प्रकरणांची संख्या व त्यातील रकमा मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यासाठी पटापट करा अर्ज, भर माहिती, द्या उत्तरे आणि हे घ्या कर्ज. अशी झटपट पद्धतीची कर्जमंजुरी आणि पाठोपाठ कर्ज वितरण करणारी टेक्नॉलॉजी तरुणाईच्या पसंतीस उतरली आहे. कर्ज मागणी करण्यापूर्वी कंपनीची वेबसाईट बघून प्राथमिक माहिती गोळा केली पाहिजे. कर्ज प्रक्रिया दिसायला सोपी आहे. शोध घेताना आपला पगार, मिळकत, आपली निकड, मार्जिन किती, कर्ज हप्ता, व्याजदर, परतफेड, दंड, आणि कागदपत्रे, डॉक्युमेंटेशन इत्यादी अशी माहिती गोळा करून नोंद करून ठेवणे आवश्यक आहे. भविष्यात आपणास हप्ते भरायचे आहेत, तेव्हा आपापली ऐपत लक्षात घेऊन कुठलेही कर्ज प्रकरण करणे केव्हाही शहाणपणाचे ठरणारे असते. असे इथे किती जरी सांगितले तरी प्रत्येकाने आपापल्या जबाबदारीवर कर्ज घेताना विचारपूर्वक जोखीम जाणून घेऊन कर्ज प्रकरण करणे उचित ठरणारे असते.



**वंदना धर्माधिकारी**
९८९०६ २३९१५

अशा २५ एनबीएफसी कंपन्यांची नावे अशी– Navi//Bajaj Finserv// CASHe// Early Salary//Dhani// Flexi Loans// Money View Loans// mPokket// Lendingkart// Indialends// NIRA// Simpl// Krazy Bee// Slice// One Mobikwik// PhonePe// Amazon Pqy// Filpkart Finance// Zest Money// True Balance// Mobiquity// MyLoneCare// Capital Floating// KreditBee// KreditZY. त्यांची लिंक आहे – https://www.creditmantri.com/article-top-25-best-rbi-approved-loan-apps-in-india/-

– **वंदना धर्माधिकारी,** Vandana10dyahoo.co.in
M - 9890623915 ❊❊❊❊




THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
Regd.No. YML/BNK/114
दि यवतमाळ अर्बन
को-ऑप बँक लि., यवतमाळ
|| साहसे श्री : प्रतिवसति ||
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ - ४४५००१
Website : www.yavatmalurbanbank.com
अमृत वर्षा
पुनर्गुंतवणुक ठेव योजना
दि. ०१ जुन २०२५ ते दि. ३१ मार्च २०२६
गुंतवणूक कालावधी
४४४ दिवसांकरिता
योजनेचा सामान्य व्याजदर 6.85%
केवळ ज्येष्ठ नागरिकांकरिता 7.35%
अधिक माहितीकरीता शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.
| डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर,
श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर,
श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक),
श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**




# सहकार महर्षी

**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
  शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

**सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक**

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

**श्री. विनायक भिसे :** रिजनल हेड (पश्चिम महाराष्ट्र व कोकण) 9923396312

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

AURO®
SINCE 1948

ISO CERTIFIED ISO 9001 : 2008

BIS Certified
IS : 550 CM/L.No.7200069405
IS : 550 CM/L.No.3740863
IS : 550 CM/L.No.2863066
IS : 550 BIS Certified



SALES & SERVICES

# ALL MAHARASHTRA REGION

CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

Contact : Mrs. Suvarna Kshirsagar

Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002

mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com

7559283467 I 9685061515 I 9879791521

## सांगली अर्बन बँकेच्या विविध कर्ज योजना


कार लोन


होम लोन


गोल्ड लोन


एमएसएमई लोन


एज्युकेशन लोन


धन्वंतरी लोन

* व्याजदर - नियम व अटी लागू.

**अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**मोबाईल : ७८८८००९७१८**

Since 1935

SUB

SUB का साथ, आपका विकास

# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८



## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2026 बँक / पतसंस्था दैनंदिनी

सहकार भारती

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश

**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**




**नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६**

किंमत रु. 500/-

**अधिक प्रतींसाठी विशेष सवलत**


आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-

**अधिक प्रतींसाठी विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!

**नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६**




सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# बाळगू सावधानता, राहू सतर्क, करू सार्थ डिजिटल पेमेंटचे पर्व !

Digital Payment Awareness Week
10th-16th March 2025

Har Payment Digital

## ऑनलाईन माहिती सुरक्षित ठेवण्यासाठीचे महत्वाचे उपाय

सार्वजनिक कॉम्पुटर किंवा वायफाय वापरणे टाळा

कठीण पासवर्ड ठेवा आणि तो नियमित बदला

शक्यतो व्यवहार ऑथेंटीकेट करण्यासाठी दोन घटक ठेवा

कोणत्याही वेबसाईट /ॲपवर क्लिक करताना काळजी घ्या

तुमचे लॉगीन आयडी आणि पासवर्ड कोणालाही सांगू नका

आपला खातेउतारा नियमितपणे तपासा

प्रत्येक व्यवहाराचे एसएमएस/इमेल मिळण्याचे सेटिंग चालू ठेवा

आपल्या कॉम्पुटरवर ॲन्टी व्हायरस सॉफ्टवेअर वापरा

संपर्क : 8485871252

# जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,



स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
लोक
मान्सून
योजना 2025
*10.25%
प्रतिवर्ष
या पावसाळ्यात तुमची संपत्ती
वाढवण्याची सुवर्ण संधी!
ठेव मुदत
५०० दिवसांची
किमान ठेव
₹१०,०००/-
(उच्च मर्यादा नाही)
वरिष्ठ नागरिक
(६०+ वर्ष) ०.५०%
अतिरिक्त व्याज दर
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 lokmanyasociety.org

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Reg. No. : MSD/057/2025
(Publication Date - 05/07/2025) Posting on 07/07/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001




**प्रेषक :**

**सहकार सुगंध कार्यालय**

ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**